रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ८९
www.ramprahar.com
◆ शुक्रवार, १६ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## दिवाळीत सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यांवर फटाके बंदी

**मुंबई :** दिवाळीत सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यांवरील फटाक्यांचा कडकडाट यंदा शमण्याची शक्यता



आहे. उच्च न्यायालयाने राज्यभर सार्वजनिक ठिकाणी आणि रस्त्यांवर आतषबाजी करण्यास बंदी घातली आहे. सणांच्या दिवसात मुंबई-पुण्यासारखी शहरे उत्सवकाळात जगण्या आणि राहण्यायोग्य राखण्यासाठी यंदाच्या दिवाळीत सार्वजनिक ठिकाणे आणि रस्त्यांवर फटाके वाजवण्यास बंदी आवश्यक असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी (दि.१५) सांगितले. हे निर्देश केवळ यंदाच्या सणापुरते मर्यादित नसून येत्या काळातही ते कायम लागू राहतील. याबाबतची नियमावली आठवड्याभरात नियमावली प्रसिद्ध करून त्याची कठोर अंमलबजावणी सुरू करण्याचे आणि ही नियमावली कायमस्वरूपी असल्याचे आदेशही न्यायालयाने दिले. याबाबत व्यापक जनजागृतीसाठी सेलिब्रिटींची मदत घेण्याची सूचनाही न्यायालयाने दिली आहे.

अंतरंग
नवरात्रीत फुलांना मागणी ; आदिवासींना रोजगार/२
महिला सक्षमीकरणासाठी स्त्री शक्ती संघटन आणि संवाद/५
आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेसाठी तुषार सिनलकरची निवड/८

# डिजिटल शासनसेवांना मिळणार गती!

### प्लॅटफॉर्म तत्काळ सुरू करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील नागरिकांना शासकीय सेवा अधिक जलद, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने ऑनलाइन उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने डिजिटल सेवा वितरणावर भर दिला आहे. 'महाडीबीटी २.०', 'आपले सरकार २.०' आणि 'मैत्री २.०' या प्लॅटफॉर्मवरील प्रलंबित कामे ३१ डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. या डिजिटल सेवा प्लॅटफॉर्मचे २६ जानेवारी रोजी लोकार्पण करण्याच्या दृष्टीने सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील वर्षा निवासस्थानी यासंदर्भात गुरुवारी (दि. १५) बैठक पार पडली. या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार, राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, समग्र संस्था प्रतिनिधी यांच्यासह टीम महाआयटी, टीम मैत्री, टीम समग्र उपस्थित होती.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शासनाने संपूर्ण प्रक्रियेसाठी 'एंड-टू-एंड' डिजिटल प्लॅटफॉर्म तयार केला आहे. त्याचे बॅकएंड जीपीआरनुसार सक्षमपणे विकसित करणे आणि प्रत्यक्ष सेवा वितरण प्रभावी होणे आवश्यक आहे. ही व्यवस्था अखंडपणे कार्यान्वित झाल्यास विभागांवरील दैनंदिन प्रशासकीय ताण ५० टक्क्यांनी कमी होईल आणि नागरिकांना शासकीय कार्यालयांशी प्रत्यक्ष संपर्क साधण्याची आवश्यकता भासणार नाही.



### 'स्मार्ट' केंद्रांचा होणार गौरव

राज्यातील ३२ हजार ४७९ सक्रिय सेवा केंद्रांपैकी १७ हजार ५१७ केंद्रांनी प्रमाणित निकषांची पूर्तता केल्याचा अहवाल दिला असून १२ हजार ८२४ केंद्रांची पडताळणी पूर्ण झाली आहे. अर्जसंख्या, कार्यरत दिवस, मंजुरीचे प्रमाण, नागरिकांचा अभिप्राय आणि गुणवत्ता निकषांच्या आधारे केंद्रांचे 'स्मार्ट', 'सक्षम', 'उदयोन्मुख' आणि 'प्रयत्नशील' असे वर्गीकरण करण्यात येत आहे. 'स्मार्ट' केंद्रांचा गौरव २६ जानेवारी २०२७ रोजी करण्याचे नियोजन असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# पनवेल महापालिका स्वत:ची परिवहन सेवा करणार सुरू

### विशेष सर्वसाधारण सभेत मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा गुरुवारी (दि.१५) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आली होती. महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत महापालिकेची स्वतःच्या मालकीची परिवहन सेवा सुरू करण्यासह विविध विषयांवर चर्चा करून विषय मंजुरी देण्यात आली.

मंचावर महापौर पाटील यांच्यासह उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, महापालिका सचिव नानासाहेब कामठे, उपसचिव अक्षय कदम उपस्थित होते.



यावेळी पनवेल महापालिकेची स्वतःच्या मालकीची परिवहन सेवा सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चेत सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, ॲड. मनोज भुजबळ, ॲड. प्रथमेश सोमण, सुमित झुंजारराव, रामदास शेवाळे, डॉ. प्रियांका कांडपिळे आदींनी भाग घेतला. सर्वांच्या सहमतीने हा विषय मंजूर करण्यात आला.

याशिवाय पनवेल महापालिका क्षेत्रातील रेल्वे फाटक नसलेल्या ठिकाणी महारेलमार्फत उड्डाणपुले बांधण्याबाबतचा विषय मंजूर करण्यात आला. **(पान २ वर..)**

## एसटीची हंगामी भाडेवाढ रद्द

### प्रवाशांना दिलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

दरवर्षी दिवाळीच्या गर्दीच्या काळात एसटीच्या प्रवासी भाड्यात हंगामी वाढ केली जाते. यंदाही १ ते १५ नोव्हेंबर या कालावधीत प्रवासी भाड्यात सरसकट १५ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव एसटी प्रशासनाने परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्याकडे सादर केला होता, मात्र दुष्काळासह आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या जनतेवर आणखी भार टाकणे योग्य नसल्याची भूमिका घेत त्यांनी हा प्रस्ताव फेटाळला.

एसटी ही ग्रामीण महाराष्ट्रातील लाखो नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, नोकरदार, ज्येष्ठ नागरिक आणि कष्टकरी वर्गासाठी ती परवडणाऱ्या प्रवासाचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे भाडेवाढीचा थेट परिणाम त्यांच्या दैनंदिन खर्चावर झाला असता. विशेषतः दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या कुटुंबांना हा अतिरिक्त भार सहन करणे कठीण झाले असते, असे सांगून मंत्री सरनाईक यांनी एसटी महामंडळाच्या आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी पर्यायी मार्ग शोधू, असे म्हटले आहे.

# पुणे पदवीधर आणि शिक्षक विधान परिषद मतदारसंघांमध्ये रणधुमाळी

### भाजप निवडणूक प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत सांगलीत बैठक





**सांगली : प्रतिनिधी**

विधान परिषदेच्या पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सांगली, पलूस, तासगाव पेठ येथे पनवेलचे आमदार तथा भाजपचे निवडणूक प्रभारी प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक पार पडली.

या बैठकीला पलूसचे ज्येष्ठ भाजप नेते पृथ्वीराजबाबा देशमुख, मंडळ अध्यक्ष संदीप मोरे, ग्रामीण मंडळ अध्यक्ष मिलिंद पाटील, सर्जेराव अण्णा नलवडे, सागर नलवडे, गणेश पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

निवडणुकीच्या दृष्टीने संघटन अधिक मजबूत करणे आणि निवडणुकीचे अचूक नियोजन आखणे या मुख्य मुद्द्यांवर या बैठकीत सविस्तर विचारविनिमय करण्यात आला.

## निवडक

### पेशावरमध्ये शाळेचे छत कोसळून २७ विद्यार्थ्यांसह शिक्षिकेचा मृत्यू

**पेशावर :** पाकिस्तानमधील पेशावर शहरात एका खासगी शाळेचे छत कोसळून २७ विद्यार्थ्यांसह एका शिक्षिकेचा मृत्यू झाला आहे. या घटनेत ४०पेक्षा जास्त नागरिक जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत तसेच ढिगाऱ्याखाली अनेक जण अडकल्याची भीती व्यक्त होत आहे. त्यादृष्टीने बचावकार्य सुरू आहे.

### दिल्लीत मुसळधार पाऊस; सखल भागांत साचले पाणी

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रासह देशाच्या अनेक राज्यांत उन्हाचा पारा चढत असताना राजधानी दिल्लीसह उत्तर प्रदेशच्या काही भागांमध्ये गुरुवारी (दि.१५) मुसळधार पाऊस पडला. या पावसाने दिल्लीकरांची उकाड्यातून सुटका झाली, पण सखल परिसरातील रस्ते पाण्याखाली गेले. काही ठिकाणी गुडघ्याइतके पाणी साचल्याने नागरिकांना आणि वाहनधारकांना कसरत करावी लागली. तिकडे तामिळनाडूमध्येही दमदार पर्जन्यवृष्टी झाली.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अर्थसहाय्याबद्दल भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळींकडून देवाभाऊंचे अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रावर भीषण दुष्काळाचे सावट दाटले असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्रातील महायुती सरकारने पाणी, पीक, चारा नियोजनाबरोबरच विविध दिलासादायक उपाययोजना केल्या आहेत. राज्यातील ३०५ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आले असून शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांचे अग्रिम अर्थसहाय्य जमा करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी शेतकऱ्यांच्या वतीने फडणवीस सरकारचे अभिनंदन केले आहे.



संवेदनशील राज्य सरकारने यापूर्वीच राज्यातील साडेतीन लाख कुटुंबांच्या कर्जमाफीचा मार्ग मोकळा करून बळीराजाला मोठा दिलासा दिला, तर आता दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांकडे कर्जवसुलीकरिता तगादा लावणाऱ्या यंत्रणांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सक्त तंबी दिली आहे. पिण्याचे पाणी आणि पुरेसा चारा उपलब्धतेसाठी ठोस उपाययोजनांद्वारे दुष्काळाशी दोन हात करण्याची तयारी करून सरकारने एक आदर्श उभा केला आहे. दुष्काळी तालुक्यांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्यात आले असून जनावरांना पुरेसा चारा उपलब्ध व्हावा याकरिता चारा देणाऱ्या पिकांचे नियोजन करण्यात येत आहे. शेतकऱ्यांकडून हमीभावाने चारा खरेदी करण्याचा निर्णय घेऊन जनावरांना जगविण्याची हमी सरकारने घेतल्याने शेतकऱ्यांनीही दुष्काळाचा सामना करण्यासाठी हातात हात घालून सरकारला साथ द्यावी, असे आवाहन जिल्हाध्यक्ष कोळी यांनी केले आहे.

राज्यातील दुष्काळी स्थिती ही नैसर्गिक आपत्ती आहे. या परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्वांनी सामूहिकपणे प्रयत्न करण्याची गरज असताना या प्रश्नावर विरोधकांकडून केले जाणारे राजकारण दुर्दैवी आहे, अशी खंतदेखील जिल्हाध्यक्ष कोळी यांनी व्यक्त केली. **(पान २ वर..)**

### कर्नाटकातील काँग्रेस सरकारकडून शेतकऱ्यांना फक्त अडीच हजारांची मदत

महाराष्ट्रातील फडणवीस सरकारने पाच हजार रुपयांची अग्रिम मदत जाहीर केलेली असताना, कर्नाटकातील काँग्रेस सरकारने मात्र दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांची केवळ अडीच हजार रुपये मदतीच्या घोषणेवर बोळवण केली आहे, याकडे भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी लक्ष वेधले. फडणवीस सरकारने जाहीर केलेली मदत कर्नाटकापेक्षा दुप्पट असून कर्नाटक सरकार मात्र अजूनही केंद्राकडून मदत मिळण्याची वाट पाहात असल्याने तेथील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्षात ही तपुटपुंजी मदत तरी वेळेवर मिळेल का याबाबत शंकाच आहे, असे ते म्हणाले.

## भीषण अपघातात एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू

**जळगाव : प्रतिनिधी**

जळगाव जिल्ह्यातील जामनेर-बोदवड मार्गावर मालदाभाटी गावाजवळ गुरुवारी (दि.१५) दुपारी भरधाव मालवाहू ट्रकने एका दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकीवरून जाणाऱ्या एकाच कुटुंबातील सहा जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये तीन महिन्यांच्या चिमुकल्या बाळासह तीन लहान मुले, दोन पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे.

प्राथमिक माहितीनुसार मध्य प्रदेशमधील बऱ्हाणपूर येथील एक कुटुंब दुचाकीवरून जात होते. दुपारी चार वाजण्याच्या सुमारास जामनेर तालुक्यातील मालदाभाटी शिवारातील मुख्य रस्त्यावर वेगात येणाऱ्या मालवाहू ट्रकने दुचाकीला समोरासमोर जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भयानक होती की दुचाकीवरील सर्व जण हवेत उडून रस्त्यावर दूर फेकले गेले.



अपघाताचा मोठा आवाज ऐकून शेतकरी आणि आजूबाजूचे ग्रामस्थ तत्काळ मदतीसाठी धावून आले, मात्र तोपर्यंत सहाही जणांचा जीव गेला होता. अपघाताची माहिती मिळताच जामनेर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतांची ओळख पटवून त्यांच्या नातेवाइकांशी संपर्क साधण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.



**मुरूड : पर्यटकांचे आकर्षण असलेल्या जंजिरा किल्ल्याचे दरवाजे पावसाळी विश्रांतीनंतर उघडण्यात आले आहेत. त्यामुळे पर्यटक शिडाच्या होडीचा प्रवास अनुभवत हा किल्ला पाहण्यासाठी जात आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)

## नालासोपारा अत्याचार प्रकरणाचा तपास एसआयटीकडे

**वसई : प्रतिनिधी**

डेटिंग ॲपच्या माध्यमातून तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करणे आणि अश्लील चित्रफिती बनवून ब्लॅकमेलिंग केल्याप्रकरणी नालासोपाऱ्यात खळबळ उडाली आहे. २२ वर्षीय आरिफ शेखविरोधात आतापर्यंत एका अल्पवयीनसह चार तरुणींनी तक्रारी दाखल केल्या आहेत. प्रकरणाचे गांभीर्य व वाढती व्याप्ती पाहता तपासासाठी एका विशेष तपास पथकाची (एसआयटी) नियुक्ती करण्यात आली आहे.

नालासोपारा पूर्वेतील हनुमाननगर येथे राहणारा आरोपी आरिफ शेख हा डेटिंग ॲपद्वारे तरुणींशी संपर्क साधत असे. मैत्री वाढवल्यानंतर त्यांच्यावर लैंगिक अत्याचार व छुप्या मार्गाने त्यांच्या अश्लील चित्रफिती तयार करून मुलींना ब्लॅकमेल करीत असल्याचा गंभीर आरोप त्याच्यावर आहे. एकापाठोपाठ एक पीडित तरुणी पुढे आल्यामुळे हे जाळे मोठे असल्याचा संशय पोलिसांना आहे.

# टाकेदेवी मंदिरात आमदार महेश बालदी यांच्याकडून मोफत चहा-पाण्याची सेवा

### नवरात्रोत्सवानिमित्त भाविकांसाठी व्यवस्था

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

नवरात्रोत्सव म्हणजे आदिशक्तीच्या उपासनेचा, श्रद्धेचा आणि भक्तिभावाचा मंगलमय सोहळा! या पवित्र पर्वात देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची सेवा करण्याच्या भावनेतून उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी दांडफाटा येथील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या टाकेदेवी मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही मोफत चहा-पाण्याची व्यवस्था केली आहे.



टाकेदेवी मंदिराला परिसरातील भाविकांच्या मनात विशेष श्रद्धेचे स्थान आहे. टाकेदेवी ही जागृत देवता असल्याची भाविकांची श्रद्धा असून नवरात्रोत्सवाच्या काळात येथे मातेच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येत असतात. दूरवरून येणाऱ्या भाविकांना दर्शनासाठी येताना चहा-पाण्याची सुविधा उपलब्ध व्हावी या उद्देशाने आमदार महेश बालदी यांनी हा सेवाभावी उपक्रम राबविला आहे.

दरवर्षी नवरात्रोत्सवाच्या काळात आमदार महेश बालदी यांच्याकडून भाविकांसाठी ही सुविधा उपलब्ध करून दिली जाते. यंदाही ही परंपरा कायम ठेवत त्यांनी भाविकांच्या सेवेला प्राधान्य दिले आहे. या सेवाभावी उपक्रमाचे भाविकांकडून कौतुक होत आहे. याबद्दल भाविकांनी आमदार महेश बालदी यांचे आभार मानत समाधान व्यक्त केले आहे.

# ‘चेक प्रजासत्ताकातील कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक आणि उत्पादन क्षेत्रात भागीदारी करावी’

**मुंबई : प्रतिनिधी**

चेक प्रजासत्ताकातील कंपन्यांनी केवळ भारतीय बाजारपेठेत उत्पादने विकण्यापुरते मर्यादित न राहता महाराष्ट्रात उत्पादन प्रकल्प उभारावेत, गुंतवणूक करावी आणि तंत्रज्ञानाच्या देवाणघेवाणीतून दीर्घकालीन भागीदारी विकसित करावी, असे आवाहन राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी केले.

‘सीआयआय’च्या वतीने चेक प्रजासत्ताकाचे उपपंतप्रधान व व्यापारमंत्री कारेल हॅवलिक यांच्या उपस्थितीत भारतीय आणि चेक प्रजासत्ताकातील उद्योग प्रतिनिधींच्या बैठकीचे आयोजन हॉटेल ताज प्रेसिडेंट येथे करण्यात आले होते.




या कार्यक्रमात मंत्री रावल बोलत होते.

मंत्री रावल म्हणाले की, चेक प्रजासत्ताकाची अभियांत्रिकी, वाहननिर्मिती, अवकाश उद्योग, आधुनिक यंत्रसामग्री, रोबोटिक्स आणि वैज्ञानिक संशोधनातील क्षमता, तसेच महाराष्ट्रातील कुशल मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधांची उपलब्धता यांची सांगड घातल्यास दोन्ही देशांमधील औद्योगिक सहकार्याला मोठी चालना मिळू शकेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र देशाच्या आर्थिक विकासातील महत्त्वाचे योगदान देणारे राज्य म्हणून पुढे आले आहे. देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात महाराष्ट्राचा सुमारे ४० टक्के वाटा असून, २०२४–२५ मध्ये देशातील एकूण थेट परकीय गुंतवणुकीच्या सुमारे ३९ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात आल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबई हे देशाचे आर्थिक आणि व्यावसायिक केंद्र, पुणे हे वाहननिर्मिती,अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाचे प्रमुख केंद्र, तर नाशिक हे उत्पादन, अवकाश उद्योग आणि कृषी क्षेत्रातील संधींसाठी महत्त्वाचे ठिकाण आहे. याचबरोबर छत्रपती संभाजीनगरसह राज्यातील अन्य औद्योगिक केंद्रांमध्येही उत्पादन क्षेत्राचा विस्तार होत आहे. या औद्योगिक क्षमतेचा लाभ चेक प्रजासत्ताकातील कंपन्यांनी घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

वाहननिर्मिती, अभियांत्रिकी, औद्योगिक स्वयंचलन, विद्युत वाहननिर्मिती, अवकाश उद्योगाशी संबंधित उत्पादन आणि संरक्षण क्षेत्रातील पुरवठा साखळीच्या क्षेत्रांत दोन्ही देशांमध्ये सहकार्याच्या मोठ्या संधी आहेत. संशोधन, नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि उच्च कौशल्याधारित रोजगारनिर्मितीला प्रोत्साहन देण्यावर राज्याचा भर असून, कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, सायबर सुरक्षा आणि लेझर तंत्रज्ञानासारख्या आधुनिक क्षेत्रांमध्येही चेक प्रजासत्ताकातील कंपन्यांनी महाराष्ट्रासोबत काम करावे, असे आवाहन मंत्री रावल यांनी केले.

मंत्री रावल म्हणाले, पर्यावरणपूरक तंत्रज्ञान, पुनर्वापर, कचरा व्यवस्थापन, ऊर्जा कार्यक्षमता, कृषी व अन्नप्रक्रिया, पॅकेजिंग तंत्रज्ञान, आधुनिक बांधकाम, वास्तुरचना आणि स्मार्ट इमारत उपाययोजना या क्षेत्रांतही सहकार्याची क्षमता आहे. अशा भागीदारीतून उत्पादकता वाढविण्याबरोबरच, मूल्यवर्धनाला चालना देता येईल आणि शेतकरी तसेच उद्योगांसाठी नव्या संधी निर्माण करणे शक्य होईल. चेक प्रजासत्ताकातील उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करून स्थानिक पातळीवर उत्पादन आणि तंत्रज्ञान विकासाला हातभार लावावा, असे सांगून भारत–युरोपियन महासंघ मुक्त व्यापार करारामुळे भविष्यात आर्थिक सहकार्याच्या नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## बोलण्यात गुंतवून सोन्याची चेन नेली चोरून

**नवीन पनवेल :** बोलण्यात गुंतवून हातचलाखीने ६४ वर्षीय इसमाकडील सोन्याची चेन चोरून नेली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात १४ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. एकनाथ परशुराम पाटील हे वेशवी, उरण येथे राहत असून ते टपाल नाका, पनवेल या ठिकाणी दुपारी साडेबाराच्या सुमारास आले असता दोन अनोळखी इसमांनी मला ओळखले का असे बोलून त्यांना बोलण्यात गुंतवले आणि हातचलाखीने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन आणि खिशातील पैसे असलेले पाकीट चोरून गेले.

## भारत विकलांग सेवा संस्थान ट्रस्ट प्रदेशाध्यक्षपदी योगेश देशमुख

**कर्जत : प्रतिनिधी**

भारत विकलांग सेवा संस्थान (ट्रस्ट) चे राष्ट्रीय अध्यक्ष धीरेंद्र कुमार यांच्या वतीने कर्जतच्या योगेश मधुकर देशमुख यांची महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. प्रदेशाध्यक्ष पदी योगेश देशमुख यांची निवड करण्यात आल्यानंतर 'आपण आपल्या राष्ट्रीय अध्यक्षांनी निर्देशित केलेल्या सर्व कार्यक्रमांचे पूर्ण प्रामाणिकपणे निष्ठेने व शिस्तीचे पालन करून त्यांची अंमलबजावणी करावी.' अशी अपेक्षा संस्थांनाच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे. देशमुख यांनी 'भारत विकलांग सेवा संस्थान ट्रस्ट या संस्थसाठी ते रात्रंदिवस काम करणार आणि सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार.' असे स्पष्ट केले आहे.

## निवडक

### पोलिसांनी गांजा केला जप्त

**नवीन पनवेल :** पनवेल शहर पोलिसांनी गांजा जप्त करत महिलेविरोधात गुन्हा दाखल केला. १४ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी सातच्या सुमारास बंबावीपाडा एचपी पेट्रोल पंपाच्या बाजूला झोपडपट्टीतील एका झोपडीत पार्वती मोहन जाधव (राहणार बंबावी पाडा) ही महिला गांजा विक्री करत असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तिच्या झोपडीतून ४५४ ग्राम वजनाचा गांजा जप्त केला.

### कारच्या काचा फोडून चोरी

**नवीन पनवेल :** कारची काच फोडून कारमधील दोन लाख ८५ हजार रुपये चोरून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात १४ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सुमित पुगावकर (राहणार नेरूळ सेक्टर ८) यांनी १२ ऑक्टोबर रोजी तीआरा कॉम्प्लेक्स, सेक्टर १३, खारघर येथे एर्टिगा कार पार्क केली होती. यावेळी अज्ञाताने कारची काच फोडून कार मधील रोख रक्कम चोरून नेली.

## अस्टर, झेंडू फुलांना नवरात्रीत मागणी; आदिवासी महिलांना रोजगार

**पाली : प्रतिनिधी**

जिल्ह्यासह सुधागड तालुक्यातील अनेक आदिवासी वाड्या–पाड्यांवरील आदिवासी बांधवांनी आपल्या परसात आणि रानमाळावर अस्टर आणि झेंडूच्या फुलांची लागवड केली असून सध्या या फुलांचे भरघोस उत्पादन येत आहे. त्यामुळे या फुलांना नवरात्रात मोठी मागणी आहे. जिल्ह्यातील अनेक आदिवासी वाड्या–पाड्यांवरील आदिवासी बांधवांनी आपल्या परसात आणि रानमाळावर अस्टर आणि झेंडूच्या फुलांची लागवड केली असून सध्या या फुलांचे भरघोस उत्पादन येत आहे.




विशेष म्हणजे अवघ्या १० ते २० रुपयांमध्ये फुलांची एक जुडी मिळत असल्याने ग्राहकांना अत्यंत स्वस्त दरात ताजी आणि टवटवीत फुले उपलब्ध होत आहेत. सध्या नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर देवीच्या पूजेसाठी आणि सजावटीसाठी या फुलांना आणि हारांना मोठी मागणी आहे.जिल्ह्यात पुणे आणि वाशी येथील मंडईतूनदेखील झेंडूची फुले येतात. मात्र, येथील आदिवासींनी पिकवलेल्या झेंडूच्या आणि अस्टरच्या फुलांना स्थानिक पातळीवर उत्तम प्रतिसाद मिळत आहे. अनेक आदिवासी बंधू–भगिनी टोपलीमध्ये ही फुले भरून घरोघरी आणि बाजारात विक्रीसाठी नेत आहेत, ज्यामुळे नागरिकांना अगदी सहजपणे फुले उपलब्ध होत आहेत. ही फुले विकून आदिवासींच्या हाताला काम आणि चार पैसे मिळत असल्याने त्यांना चांगला रोजगार उपलब्ध झाला आहे.

अस्टरच्या फुलांच्या एका जुडीत अस्टरची दहा रंगीबेरंगी फुले मिळतात, तर झेंडूच्या फुलांच्या जुडीत दहापेक्षा अधिक मोठी, टवटवीत आणि ताजी फुले मिळतात. पहाटे लवकर उठून डोक्यावर फुलांची टोपली घेऊन आदिवासी महिला आणि पुरुष विक्रीसाठी बाजारात येतात. यासाठी ते मोठी मेहनत आणि कष्ट घेतात.सध्या नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. घरोघरी घटस्थापना, देवीची आरास, मखर सजावट तसेच सार्वजनिक मंडळांमध्ये देवीच्या स्वागतासाठी फुलांची गरज असते. अशा वेळी पूजेसाठी, देवीच्या फोटोला किंवा मूर्तीला वाहण्यासाठी तसेच आकर्षक फुलांच्या सजावटीसाठी या स्थानिक अस्टरच्या आणि झेंडूच्या फुलांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे.

याबाबत बोलताना सुधागड तालुक्यातील चेरफळवाडी येथील फुलविक्रेता रघुनाथ शिद म्हणाले, यंदा पाऊस खूप कमी पडला आहे. मात्र सध्या फुलांच्या पिकाचा बहर चांगला येत आहे. नवरात्र आणि आगामी दिवाळी सणांमध्ये फुलांची विक्री वाढते. जास्त जुड्या घेतल्यास पन्नास रुपयाला सहा ते सात जुड्या देखील देतो. परंतु काही ग्राहक दहा रुपयाला दोन जुड्या मागतात, ते आम्हाला परवडत नाही.स्थानिक आदिवासींनी परसबागेत फुलवलेली झेंडूची आणि अस्टरची फुले अत्यंत स्वस्त आणि टवटवीत असतात. शिवाय ही फुले बाजारातील फुलांपेक्षा अधिक दिवस टिकतात.

## रॉयल ग्रुपकडून आसरे शाळेला शैक्षणिक साहित्याचे वाटप

**चौक :** रॉयल ग्रुप ऑफ कंपनी यांच्याकडून रायगड जिल्हा परिषद शाळा आसरे येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आल्याने शाळा आणि विद्यार्थ्यांना मदत झाली आहे. ग्रुप ग्रामपंचायत आसरे सरपंच बळीराम जांभळे, सहकारी आणि रायगड जिल्हा पर्यावरण विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नाने शाळेच्या खोलीची दुरुस्ती, रंगरंगोटी, सजावट, शुद्ध पाण्यासाठी फिल्टर, प्रिंटर, टेबल, खुर्ची आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी आम्ही शैक्षणिक धोरण स्वीकारले असून शाळा आणि विद्यार्थ्यांना मदत केली जाईल, असे आश्वासन कंपनी हेड जितेंद्र तिवारी यांनी दिले.

यावेळी रामकृष्ण, ग्रामविकास अधिकारी गोकुळदास राठोड, अनिल जांभळे, ग्रामपंचायत सदस्य अनिकेत निकम, मुख्याध्यापिका पाटील, शिक्षक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## नवरात्रोत्सवानिमित्त मंत्री आदिती तटकरे यांच्या नागोठणे विभागातील देवी मंदिरांना भेटी

**नागोठणे : बातमीदार**

नवरात्रौत्सवाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्याच्या महिला व बाल विकासमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या नामदार अदिती तटकरे यांनी नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता, मरीआई माता तसेच नागोठणे विभागातील पळस येथील श्री पळसाई माता आणि शेतपळस येथील श्री आकादेवी मातेचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले.



मंत्री अदिती तटकरे यांनी नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिरात जाऊन देवीचे मनोभावे दर्शन घेतले. दर्शनानंतर श्री जोगेश्वरी माता देवस्थान समितीचे सचिव भाईसाहेब टके व उत्सव समितीचे अध्यक्ष चंद्रकांत ताडकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर त्यांनी नागोठणे येथील मरीआई मातेचे दर्शन घेतले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते भाईसाहेब टके यांनी नामदार अदिती तटकरे यांचा सत्कार केला. पळस येथील श्री पळसाई माता मंदिरात जाऊन त्यांनी देवीचे दर्शन घेतले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवराम शिंदे यांच्या वतीने नामदार अदितीतटकरे यांचा सत्कार करण्यात आला.

शेतपळस येथील श्री आकादेवी मातेच्या मंदिरात अदिती तटकरे यांनी दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी शेतपळस गावातील प्रमुख ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. नवरात्रौत्सवाच्या पार्श्वभूमीवर आदिती तटकरे यांनी नागोठणे विभागातील विविध देवी मंदिरांना भेटी देऊन दर्शन घेतल्याने भाविक व ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

## बियरच्या बाटलीने केली दुखापत

**नवीन पनवेल :** बिअरची बाटली डोळ्याच्या जवळ मारून दुखापत केल्याप्रकरणी अमित भगत आणि इतर दोन अनोळखी ईसमाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात १४ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. धीरज भूल हा कामोठे गाव हनुमान मंदिराजवळ राहत असून त्याचा मित्र गीतांशी याला अमित भगत यांनी मारहाण केली होती. यावेळी धीरज सोडवण्यासाठी गेला असता अमित याला धीरजचा धक्का लागला आणि त्याचा राग आल्याने अमितने त्याच्या हातातील बियरची वाटली धीरजच्या डोळ्याजवळ मारली.

## पान १ वरुन

### पनवेल महापालिका स्वतःची परिवहन सेवा करणार सुरू

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५–२६ नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) या योजनेंतर्गत ७८ कामांना प्रशासकीय महासभेची मंजुरी मिळण्याबाबतचा विषय महासभेत मंजूर करण्यात आला.

समाज विकास विभाग अंतर्गत पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील वास्तव्य करणाऱ्या युवकांसाठी तांत्रिक आणि अतांत्रिक विविध विषयांवरील कौशल्य विकास प्रशिक्षणाचे मोफत कार्यक्रम राबविण्याबाबत तसेच समाज विकास विभागांतर्गत महापालिका कार्यक्षेत्रातील वास्तव्य करणाऱ्या युवकांसाठी नवी मुंबई विमानतळ संबंधित मोफत प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याबाबतच्या विषयास मंजुरी देण्यात आली.

समाज विकास विभागांतर्गत पनवेल हद्दीतील युवकांसाठी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या मदतीने तांत्रिक लघु उद्योजकता विकास प्रशिक्षणाचे मोफत कार्यक्रम राबविण्याबाबतचा विषय मंजूर करण्यात आला. त्याचप्रमाणे वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करण्याच्या अनुषंगाने नावे नामनिर्देशित करण्याबाबतच्या विषयास मंजुरी देण्यात आली.

### दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अर्थसहाय्याबद्दल भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळींकडून देवाभाऊंचे अभिनंदन

राज्यात साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपांचा वीजपुरवठा मोफत आहे. कर्जवसुलीच्या तगाद्यातून शेतकऱ्यास दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रिम मदत मिळणार आहे. दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना सरसकट परीक्षा शुल्क माफ करण्यात येत आहे. याशिवाय राज्यातील दोन लाखांहून अधिक अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना दोन हजार रुपयांची भाऊबीज देऊन सरकारने कुटुंबप्रमुखाची जबाबदारी संवेदनशीलतेने पेलली आहे, असे त्यांनी सांगितले.

केंद्र आणि राज्य सरकारच्या वतीने राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना बारा हजार रुपयांच्या वार्षिक सन्मान निधीमुळे समस्याग्रस्त शेतकऱ्यांना सरकारकडून मोठा दिलासा मिळाला आहे. यासाठी राज्याच्या तिजोरीतून सहा हजार कोटींहून अधिक निधी उपलब्ध करून देण्यात आला असल्याने बळीराजासाठी संवेदनशीलतेने मदतीचा हात पुढे करणाऱ्या महाराष्ट्रातील फडणवीस सरकारचे अनुकरण काँग्रेसशासित राज्यांनी केले पाहिजे, असा सल्ला जिल्हाध्यक्ष कोळी यांनी दिला.

पीएम किसान सन्मान योजना, नमो शेतकरी योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, प्रधानमंत्री पीकविमा योजनेतील राज्याचा सहभाग, कृषीपंपांना वीजबील माफी आणि दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची अग्रिम मदत अशा अनेक योजनांद्वारे शेतकऱ्याच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या असलेल्या फडणवीस सरकारने दुष्काळाला तोंड देण्याची सज्जता केली आहे. आता सर्वांनी मिळून त्याला साथ द्यावी. विरोधकांनी राजकारण न करता जनतेच्या हिताचा विचार करावा आणि पुढच्या पिढ्यांना दुष्काळाच्या समस्येतून कायमची मुक्ती देण्याच्या मुख्यमंत्री फडणवीस यांच्या संकल्पास शक्ती द्यावी, असे आवाहनही जिल्हाध्यक्ष कोळी यांनी केले आहे.

## माणगाव तालुका प्रेस क्लबच्या माध्यमातून वावे दिवाळी शाळेत सामाजिक उपक्रम

**माणगाव : बातमीदार**

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे, त्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण व्हाव्यात आणि त्यांच्यामध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी, या उदात्त हेतूने माणगाव तालुका प्रेस क्लबच्या माध्यमातून तसेच सुलोचना बापू जाधव यांच्या स्मरणार्थ रायगड जिल्हा परिषद केंद्र शाळा, वावे दिवाळी येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.



बुधवार, दिनांक १४ ऑक्टोबर रोजी आयोजित या उपक्रमांतर्गत इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना दप्तर व वह्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकी जपत शिक्षणाला हातभार लावण्याचा प्रेरणादायी संदेश या माध्यमातून देण्यात आला.आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यासाठी शाळा, शिक्षक आणि पालक यांच्यासोबतच समाजातील विविध घटकांचे सहकार्यही महत्त्वाचे ठरते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक असलेले साहित्य उपलब्ध व्हावे, आर्थिक अडचणींमुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होऊ नयेत आणि त्यांचा शाळेतील सहभाग अधिक उत्साहपूर्ण व्हावा, या भावनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. दप्तर आणि वह्या यांसारखे शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांच्या दैनंदिन शिक्षणासाठी उपयुक्त ठरणार असून, या मदतीमुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी नवी प्रेरणा मिळणार आहे.

या कार्यक्रमाला माणगाव तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष संतोष सुतार, सुलोचना बापू जाधव सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा वैष्णवी जाधव आणि विश्वनाथ जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी वावे दिवाळी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच शरदचंद्र कदम, सामाजिक कार्यकर्ते महेश राऊत, माणगाव तालुका प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष गौतम जाधव, क्लबचे सदस्य उत्तम तांबे, विनोद सापले, सचिन वनारसे, सुनील राजभर, ॲड. कुंदन जाधव, केंद्रप्रमुख ज्योती देवेंद्र हंगरगे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका राज्यश्री विजय यादव उपस्थित होत्या. याशिवाय शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थीही या उपक्रमात सहभागी झाले.

# आशीर्वादाचा दिवा उपक्रमातून महिलांना शासकीय योजनांची माहिती




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यपंतप्रधानांच्या घटनात्मक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने, तसेच 'सेवा परमो धर्मः' या उक्तीनुसार सर्वसामान्य नागरिकांपर्यंत विविध शासकीय योजनांचे लाभ पोहोचवण्याच्या उद्देशाने राज्यात 'सेवा संकल्प अभियान' राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिकेच्या वतीने पनवेल आणि कामोठे येथे बचतगटातील महिला लाभार्थीसाठी 'आशीर्वादाचा दिवा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास महानगरपालिकेच्या सहायक आयुक्त डॉ. रुपाली माने, माजी नगरसेविका हेमलता गोवारी व शीला भगत उपस्थित होत्या. याप्रसंगी डॉ. रुपाली माने यांनी उपस्थित महिलांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती दिली. तसेच महिला उद्योजिकांना आपल्या व्यवसायाचा विस्तार कसा करता येईल आणि व्यवसायवृद्धीसाठी उपलब्ध संधींचा लाभ कसा घेता येईल, याविषयी मार्गदर्शन केले.

महिलांचे सक्षमीकरण, आर्थिक स्वावलंबन आणि शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने आयोजित केलेला हा उपक्रम महिलांसाठी अत्यंत मार्गदर्शक ठरला.या कार्यक्रमाचे आयोजन महानगरपालिकेच्या 'दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान' (NULM) विभागाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहर व्यवस्थापक विनया म्हात्रे आणि नवनाथ थोरात यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पनवेल महानगरपालिकेत डॉ. अब्दुल कलाम यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताचे माजी राष्ट्रपती आणि थोर शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त गुरुवार, १५ ऑक्टोबर २०२६ रोजी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात प्रतिमापूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आली.

या कार्यक्रमास महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता म्हात्रे, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, प्रभाग समितीचे सभापती अजय बहिरा तसेच नगरसेवक, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे आणि परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त मंगला माळवे, लेखाधिकारी संग्राम व्होरकटे , सहायक आयुक्त बाळाराम रातांबे,यांच्यासह महानगरपालिकेतील अधिकारी व पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षण क्षेत्रात दिलेले योगदान देशासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमातून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला.



# डॉ. एपीजे अब्दुल कलाम जयंतीनिमित्त एमएनएम विद्यालयात वाचन प्रेरणा दिन




**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम. एन. एम. विद्यालय व टी. एन. जी. कनिष्ठ विज्ञान विद्यालय, गव्हाण-कोपर येथे भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि युवकांचे प्रेरणास्थान डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्यात ज्ञानाची ओढ वाढावी आणि डॉ. कलाम यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन त्यांनी उज्ज्वल भविष्य घडवावे, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांनी प्रेरणादायी समूहगीत सादर केले. तसेच डॉ. कलाम यांचे जीवनकार्य, विज्ञान क्षेत्रातील त्यांचे अमूल्य योगदान आणि भारताच्या प्रगतीसाठी त्यांनी दिलेले योगदान यांविषयी विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. त्यांच्या जीवनावर आधारित लघुनाटिकेतून विद्यार्थ्यांनी डॉ. कलाम यांचे प्रेरणादायी विचार प्रभावीपणे सादर केले.

या प्रसंगी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व समजावून सांगितले. वाचनामुळे ज्ञानात भर पडते, विचारशक्ती विकसित होते आणि व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा मिळते, असे मार्गदर्शन करण्यात आले.विद्यालयाच्या प्राचार्या सायली वडवलकर यांनी आपल्या विद्यार्थ्यांना नियमित वाचन करण्याचे, ज्ञानाची कास धरण्याचे आणि डॉ. कलाम यांच्याप्रमाणे मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाला प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला उत्साहपूर्ण वातावरण लाभले. शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सहभागातून वाचनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

# पनवेलमध्ये मोफत स्तन कर्करोग तपासणी शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

महिलांमध्ये स्तन कर्करोगाबाबत जागरूकता निर्माण करणे आणि वेळेत निदानाचे महत्त्व पटवून देण्याच्या उद्देशाने पार्श्वा वुमेन्स फाउंडेशनच्यावतीने पनवेल येथे मोफत स्तन कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउन, इनर व्हील क्लब ऑफ न्यू पनवेल आणि पीसीसी कॅन्सर केअर अँड रिसर्च सेंटर यांचे सहकार्य लाभले.

हे शिबिर पीसीसी सेंटर केअर, पनवेल येथे आयोजित करण्यात आले होते. महिलांनी आरोग्याबाबत जागरूक राहावे, नियमित तपासणी करून घ्यावी आणि स्तन कर्करोगाची संभाव्य लक्षणे दिसल्यास तातडीने वैद्यकीय सल्ला घ्यावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

या उपक्रमात रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउनच्या अध्यक्षा रोटेरियन डॉ. जयश्री पाटील, सचिव रोटेरियन अॅड. हितेश राजपूत, इनर व्हील क्लब ऑफ न्यू पनवेलच्या अध्यक्षा अंजली तवटे आणि सचिव पल्लवी पाटील यांच्यासह पार्श्वा वुमेन्स फाउंडेशनच्या सदस्यांनी सहभाग घेतला. डॉ. पुष्पक चिरमाडे यांच्यासह बसंती जैन, शीतल ठक्कर, धनश्री गुंडेचा, रीना परमार, नैना भंथिया, भूमिका परमार, नेहा गांधी, मनाली परमार आणि पूजा मारलेशा यांनीही या उपक्रमासाठी सहकार्य केले.




# सीकेटी विद्यालयात दांडियाचा जल्लोष!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर विद्यालयात दि. १५ ऑक्टोबर रोजी नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून दांडिया उत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. रंगीबेरंगी पारंपरिक वेशभूषा, दांडियाचा ताल आणि गरब्याच्या गाण्यांनी संपूर्ण विद्यालय परिसर भक्तिमय व उत्साहपूर्ण झाला होता.



कार्यक्रमाची सुरुवात देवीचे पूजन व आरती करून करण्यात आली. त्यानंतर गरब्याच्या तालावर विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे पावले थिरकवत दांडियाचा मनमुराद आनंद लुटला. पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थ्यांच्या उत्साहाने कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात नवदुर्गांचे विशेष आकर्षण ठरलेल्या विद्यार्थिनींचे कौतुक करून त्यांचा सन्मान करण्यात आला. नवदुर्गांच्या रूपातील या विद्यार्थिनींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या सन्मानातून नारीशक्तीचा गौरव तसेच स्त्रीशक्तीप्रती आदरभाव व्यक्त करण्यात आला.

या उत्सवात विद्यार्थ्यांसोबतच विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत गरब्याचा आनंद अनुभवला. संगीताचा ताल, दांडियाची लय आणि सर्वांच्या चेहऱ्यावरील आनंद यांमुळे संपूर्ण वातावरण उत्साहाने भारून गेले.

परंपरा, संस्कृती आणि एकात्मतेचा सुंदर संगम घडवणारा हा दांडिया उत्सव सर्वांसाठी आनंददायी आणि संस्मरणीय ठरला. अशा सांस्कृतिक उपक्रमांतून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीची ओळख होण्याबरोबरच एकोप्याची आणि सहकार्याची भावनाही वृद्धिंगत होते.

# रिटघर विद्यालयात वाचन प्रेरणा दिन

**रिटघर : रामप्रहर वृत्त**

श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, रिटघर येथे गुरुवार (दि.१५) रोजी वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.




या कार्यक्रमाचे अध्यक्ष निलेश पाटील ,विद्यालयाचे मुख्याध्यापकश्री.कारंडे, पर्यवेक्षिका बाबर मॅडम, विद्यालयातील सर्व शिक्षकांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन १० वी ब च्या विद्यार्थ्यांनी कु.प्रणिता शेळके, कु.रिया बामुगडे, प्रास्ताविक एस.एस..पाटील यांनी केले. विद्यार्थ्यांनी आजच्या दिवसाचे महत्त्व सांगणारी भाषणे केली.

मुख्याध्यापक कारंडे यांनी आपले विचार व्यक्त केले. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष निलेश पाटील यांनी अध्यक्षीय भाषण केले. या कार्यक्रमाचे नियोजन इयत्ता १०वी ब चे विद्यार्थी व वर्गशिक्षिका एस.एस.पाटील मॅडम यांनी केले. वाचन प्रेरणा दिनाविषयी विद्यालयात ग्रंथ प्रदर्शन भरवले, तसेच वाचनाची आवड निर्माण व्हावी या दृष्टीने विद्यार्थ्यांनी पुस्तकांचे वाचन केले.



**पनवेल : येथील महानगरपालिकेच्या प्रभाग ६चे नगरसेवक नरेश ठाकूर यांचा वाढदिवस गुरुवारी साजरा झाला. यानिमित्त त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन नरेश ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सोबत अन्य मान्यवर.**

# विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा वापर करताना सतर्क राहावे -धर्मेंद्र नलावडे

**उरण : बातमीदार**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय, उरण, जिल्हा रायगड सायबर सिक्युरिटी जनजागृती आणि समस्या या विषयावर विशेष मार्गदर्शनपर सेमिनार आयोजित करण्यात आला. यात सायबर सिक्युरिटी तज्ज्ञ धर्मेंद्र नलावडे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन केले.



आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया, ई-मेल, ऑनलाइन बँकिंग व्यवहार तसेच आर्थिक व इतर ऑनलाइन व्यवहार करताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. सायबर फसवणुकीचे विविध प्रकार, त्यापासून बचाव करण्याचे उपाय आणि इंटरनेटचा सुरक्षित वापर याविषयी नलावडे यांनी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण माहिती दिली. विद्यार्थ्यांनी कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करू नये तसेच ऑनलाइन व्यवहार करताना सावधगिरी बाळगावी, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी हर्षाली जाधव यांनी मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना विविध उपयुक्त अभ्यासक्रमांची माहिती दिली. सायबर फसवणूक टाळण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी आणि करिअरच्या दृष्टीने कोणते अभ्यासक्रम निवडावेत याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.व्ही. गर्जे यांनी भूषविले. विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा वापर केवळ मनोरंजनासाठी न करता अभ्यास, ज्ञानवृद्धी, नोकरी आणि व्यवसायाच्या संधी शोधण्यासाठी योग्य पद्धतीने करावा, असे प्रतिपादन त्यांनी केले.

## संपादकीय

# मस्क यांनाही तेच नियम!

जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील अब्जाधीश उद्योजक इलॉन मस्क यांनी भारतात त्यांच्या 'स्टारलिंक' कंपनीची उपग्रह इंटरनेट सेवा सुरू करण्यास होत असलेल्या विलंबावरून काही दिवसांपूर्वी समाजमाध्यमांवर उघड टीका केली. मात्र हा केवळ एका कंपनीला मिळावयाच्या परवानगीचा विषय नाही. ही परवानगी भारताचे सार्वभौमत्व, राष्ट्रीय सुरक्षा आणि देशाच्या नियामक व्यवस्थेचा आदर या मुद्यांशी जोडलेली आहे.

**परदेशी कंपन्यांसाठी भारत ही एक मोठी, हवीहवीशी बाजारपेठ असली, तरी येथे व्यवसाय करण्यासाठी त्यांना भारतीय कायदे आणि नियमांचे पालन करणे अपरिहार्य आहे. आपल्या 'स्टारलिंक' कंपनीची उपग्रह इंटरनेट सेवा भारतात सुरू करण्यास होत असलेल्या विलंबावरून इलॉन मस्क यांनी काही दिवसांपूर्वी समाजमाध्यमांवर खोडसाळ टीका केली. त्यांनी भारतातील एका उद्योगसमूहावर स्पर्धा रोखल्याचा आरोप करत स्टारलिंकच्या येथील प्रवेशात अडथळे आणले जात असल्याचा दावा केला. मात्र केंद्र सरकारने भारतीय दूरसंचार क्षेत्रातील उपग्रह सेवांसाठीची परवानगी-प्रक्रिया निष्पक्ष आणि भेदभावरहित असल्याचे स्पष्ट केले आहे. परवान्याकरिता संबंधित कंपनीने सुरक्षाविषयक अटी आणि आवश्यक तांत्रिक व्यवस्था पूर्ण करणे महत्त्वाचे आहे हेही सरकारने नमूद केले. दुर्गम डोंगराळ प्रदेश, सीमावर्ती क्षेत्रे आदी पारंपरिक मोबाइल नेटवर्क पोहोचत नसलेल्या ठिकाणी उपग्रह इंटरनेटमुळे संपर्कसुविधा वाढू शकतात. मात्र या तंत्रज्ञानाचा वापर करताना देशांतर्गत इंटरनेट वाहतुकीवर कायदेशीर देखरेख ठेवता येणे, आवश्यकतेनुसार सुरक्षा यंत्रणांना सहकार्य मिळणे आणि भारतीय नियमांची अंमलबजावणी होणे तितकेच महत्त्वाचे आहे. विकास आणि सुरक्षा यांची सांगड घालणे ही सरकारची जबाबदारी आहे. त्यामुळे संबंधित निर्णय कदापिही परदेशी उद्योगपतींच्या सार्वजनिक दबावाखाली येऊन घेतले जाऊ शकत नाहीत. या क्षेत्रात सेवा सुरू करण्यासाठी मस्क यांची स्टारलिंक, सुनील भारती मित्तल यांच्या भारती समूहाशी संबंधित युटेलसॅट वनवेब आणि मुकेश अंबानी यांची जिओ सॅटकॉम या तीन कंपन्या उत्सुक असून तिन्ही कंपन्यांना व्यावसायिक सेवा सुरू करण्यासाठी आवश्यक अटी पूर्ण कराव्या लागणार आहेत. त्यामुळे हा प्रश्न एखाद्या कंपनीपुरता मर्यादित नाही. सुनील भारती मित्तल यांनीही आता मस्क यांच्या टीकेच्या पार्श्वभूमीवर आपली भूमिका मांडली आहे. त्यांची कंपनीही आवश्यक मंजुरी मिळण्याच्या प्रतीक्षेत असून सुमारे पाच वर्षांपूर्वीपासून या प्रक्रियेत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. पायाभूत यंत्रणा तयार असूनही आपल्यालाही परवानगी मिळालेली नाही असे सांगत त्यांनी आवश्यक मंजुरी मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. नियामक प्रक्रिया ही केवळ स्टारलिंकपुढील अडचण नाही हे यातून पुरते स्पष्ट होते. दरम्यान आता संसदेच्या दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञानविषयक स्थायी समितीने उपग्रह इंटरनेट सेवांचा विषय तपासणीसाठी निवडला आहे. भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांच्या अध्यक्षतेखालील समिती या क्षेत्रातील नियम, सुरक्षा आणि सेवांच्या विस्ताराशी संबंधित मुद्यांचा अभ्यास करणार आहे. समितीचा अहवाल संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सादर होणे अपेक्षित आहे. त्यामुळे या विषयावर संसदीय पातळीवरही चर्चा होऊन धोरणात्मक स्पष्टता येईल. मोदी सरकारसमोर आव्हान आहे ते नव्या तंत्रज्ञानाला संधी देतानाच राष्ट्रीय सुरक्षेशी तडजोड होऊ न देण्याचे. भारताला गुंतवणूक, स्पर्धा आणि आधुनिक तंत्रज्ञान हवे आहे, पण ते स्वतःच्या अटींवर. कारण भारत ही केवळ एक बाजारपेठ नाही. तो स्वतःचे कायदे, हितसंबंध आणि प्राधान्यक्रम ठरवणारा सार्वभौम देश आहे.**

# पर्यटन क्षेत्रात महिला सक्षमीकरणाला नवी दिशा

नवरात्रोत्सव हा स्त्रीशक्तीचा सन्मान आणि तिच्या सामर्थ्याचा गौरव करणारा उत्सव आहे. महिलांचे हे सामर्थ्य उद्योजकतेच्या माध्यमातून अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र पर्यटन विभाग 'आई' महिला-केंद्रित धोरण राबवित आहे. महिला उद्योजकतेला प्रोत्साहन, पायाभूत सुविधांचा विकास आणि महिला पर्यटकांची सुरक्षितता या प्रमुख उद्दिष्टांवर आधारित हे धोरण पर्यटन क्षेत्रातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला नवी दिशा देत आहे. या धोरणांतर्गत मान्यताप्राप्त बँकांकडून घेतलेल्या १५ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावरील व्याजाचा परतावा थेट लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात जमा करण्याची तरतूद आहे. या आर्थिक पाठबळामुळे महिलांना स्वतःचा पर्यटन व्यवसाय उभारण्याची आणि रोजगारनिर्मितीत योगदान देण्याची संधी मिळत आहे.




### धोरण महिलासांठी उपयुक्त

पुणे जिल्हयातील वेद कस्तुरी ॲग्रो टुरिझमच्या कल्याणी कराळे म्हणाल्या की, "आई धोरणांतर्गत मिळालेल्या निधीच्या मदतीने आम्ही जुन्नर तालुक्यातील आमच्या गावात एक कॉटेज बांधले आहे. येथे पर्यटक येऊन राहतात. आम्ही त्यांच्यासाठी पारंपरिक पद्धतीच्या जेवणाची सोय करतो. यामुळे त्यांना या भागातील खाद्यसंस्कृतीची माहिती मिळते. तसेच कृषी पर्यटनाचीही पर्यटकांना ओळख होते. शेती कशी केली जाते, विविध भाज्यांचे उत्पादन कसे होते याबाबत आम्ही माहिती देतो. तसेच आंब्याच्या हंगामामध्ये पर्यटकांना बागेमध्ये जाऊन फळांचा आस्वादही घेता येतो. पर्यटन विभागाच्या 'आई' धोरणाबाबत मला माझ्या एका ओळखीच्या व्यक्तीकडून माहिती मिळाली. यानंतर मी पर्यटन विभागाच्या कार्यालयात जाऊन संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेतली. अधिकाऱ्यांनी मला या धोरणाबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनानुसार मी 'आई' धोरणांतर्गत अर्ज केला. ही योजना महिलांसाठी उपयुक्त ठरत आहे. यामुळे महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहत आहेत. आई योजनेबाबत मी इतर लोकांनाही सांगते, जेणेकरून गरजू व्यक्ती या योजनेचा लाभ घेऊ शकतील."

### इतर महिलांनाही योजनेबाबत समजावून सांगते

लातूर जिल्हयातील वृंदावन ॲग्रो टुरिझमच्या सुवर्णा चामे म्हणाल्या की, "मला नेहमीच माझ्या गावात नवीन व्यवसाय सुरु करायचा होता. पण आर्थिक अडचणींमुळे हे शक्य होत नव्हते. त्यानंतर गावामधीलच एका व्यक्तीकडून मला पर्यटन विभागाच्या 'आई' धोरणाबाबत माहिती मिळाली. पुढील प्रक्रियेसाठी पर्यटन विभागाशी संपर्क साधून मी या धोरणाबाबत जाणून घेतले. पर्यटन विभागाच्या अधिकाऱ्यांनी निधी मिळवून देण्यात खूप मदत केली. संबंधित अधिकाऱ्यांनी बँकेशी संपर्क साधून याबद्दल माहिती दिली. यातून मिळालेल्या निधीमुळे आज मी स्वतःचे स्वयंपाकघर चालवत आहे. याद्वारे पर्यटकांना पारंपरिक पद्धतीचे जेवण मिळते. 'आई' धोरण महिलांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. इतर महिलांनाही मी या योजनेबाबत समजावून सांगते. गेली दोन वर्ष माझा हा व्यवसाय अगदी सुरळीत सुरु आहे."

### आर्थिक पाठबळ मिळाले

नागपूर जिल्ह्यातील आई जनरल स्टोअरच्या सीमा मढवी म्हणाल्या की "गावामधील एका ओळखीच्या व्यक्तीने मला पर्यटन विभागाच्या आई धोरणाबाबत माहिती दिली होती. यानंतर मी नागपूर येथील पर्यटन विभागाच्या कार्यालयाला भेट दिली. तेथील संबंधित अधिकाऱ्यांनी मला या धोरणाबाबत समजावून सांगितले. निधीसाठी अर्ज करण्यापासून ते बँकेच्या कागदपत्रांच्या प्रक्रियेपर्यंतच्या कामकाजासाठी अधिकाऱ्यांनी खूप मदत केली. धोरणाअंतर्गत मिळालेल्या निधीमधून मी एक जनरल स्टोअर सुरू केले. या दुकानाचे नाव या धोरणाच्या नावावरून 'आई जनरल स्टोअर' असेच ठेवले. पर्यटन विभागाकडून वेळेवर व्याजाचा परतावाही मिळतो. यामुळे मला आर्थिक पाठबळ मिळाले आहे."

### युट्युब व्हिडीओद्वारे धोरणाबाबत माहिती मिळाली

ठाणे जिल्हयातील कृषी पर्यटन केंद्राच्या सुचेता पाटील म्हणाल्या की, "आम्ही आमच्या जागेमध्ये लाकडाचा वापर करुन पारंपरिक पद्धतीने घर बांधले आहे. तीन कॉटेज राहण्यासाठी उपलब्ध आहेत. येथे विकेण्डला आम्ही निवासी योग शिबिरे घेतो. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये या ठिकाणी येण्यासाठी पर्यटक आतूर असतात. निसर्गाच्या सानिध्यात राहून योग करण्याचा अनुभव पर्यटकांना घेता येतो. शिवाय पर्यटकांसाठी निवास व्यवस्थाही आहे. खाण्याचीही उत्तम सोय आहे. आंबा, काजू, चिकू यांसारख्या फळांच्या बागा आहेत. शिवाय अंगणातच केल्या जाणाऱ्या शेतातील ताजी भाजी पर्यटकांच्या ताटात असते. आपल्या मातीतील खरा आनंद पर्यटकांना देण्याचा आमचा प्रयत्न असतो. व्यवसायाची उभारणी करत असताना एका युट्युब व्हिडीओद्वारे शासनाच्या 'आई' धोरणाबाबत आम्हाला माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे आम्ही पर्यटन विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधला. ज्या ठिकाणी केंद्र उभारले आहे त्या जागेची पाहणीही पर्यटन विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून करण्यात आली. आम्ही बँकेद्वारे व्यवसाय उभारणीसाठी कर्ज घेतले. 'आई' धोरणाच्या आधारे आम्हाला शासनाच्या पर्यटन विभागाकडून या व्याजाचा परतावा मिळतो. थेट बँक खात्यामध्ये व्याजाची रक्कम जमा होते. आई धोरणामुळे आम्हाला आर्थिक पाठबळ मिळाले आहे."

### व्याजाचा नियमित परतावा बँक खात्यामध्ये जमा होतो

अमरावती जिल्हयातील पंजाबराव पाटील ढाबाच्या संगीता मांडवगडे म्हणाल्या की, आमचा हॉटेल व्यवसाय सुरु असताना पर्यटकांना अधिक चांगली सेवा मिळावी म्हणून, आम्ही बऱ्याच सुधारणा केल्या. यासाठी लागणार खर्च मोठा होता. त्यासाठी बँकेद्वारे आम्ही कर्ज घेतले. कर्जाची परतफेड करत असताना नियमांनुसार व्याजही नियमित भरणे हा मोठा प्रश्न होता. दरम्यानच्या काळात आई धोरणाबाबत मला माझ्या मित्रांकडून माहिती मिळाली. त्यानुसार मी पर्यटन विभागाच्या कार्यालयाला भेट दिली. संबंधित अधिकाऱ्यांनी मला या धोरणाबाबत मार्गदर्शन केले. याच मार्गदर्शनानुसार 'आई' धोरणासाठी अर्ज केला. या धोरणाअंतर्गत व्यवसायासाठी बँकेद्वारे घेतलेल्या व्याजाचा नियमित परतावा आमच्या बँक खात्यामध्ये जमा होतो. अर्ज करण्याच्या प्रक्रियेपासून ते व्याजाची रक्कम बँक खात्यामध्ये जमा होण्यापर्यंतची प्रक्रिया खूप सुरळीत झाली. आम्हाला या विशेष योजनेमुळे आर्थिक बळ मिळाले आहे. मी इतर गावांमधील लोकांनाही या धोरणाविषयी माहिती दिली. काही महिलांनाही आई धोरणाविषयी सविस्तर सांगितले."

### आर्थिक सहाय्य लाभल्यामुळे व्यवसाय सुरळीत

नाशिक जिल्हातील टूर ऑपरेटर उमा देशपांडे म्हणाल्या की"'करुया भ्रमंती' नावाने आमचा टूर ऑपरेटरचा व्यवसाय आहे. या व्यवसायासाठी मला बँकेकडून कर्ज घेणे गरजेचे होते. कर्जाशी संबंधित बँकेकडे संपर्क साधता तेथील मॅनेजरनेच मला शासनाच्या 'आई' धोरणाबाबत माहिती दिली. त्यानुसार पर्यटन विभागाच्या कार्यालयाशी मी संपर्क साधला. त्यानंतर अर्ज कसा करायचा, आवश्यक कागदपत्रे याबाबत त्यांनी मला सविस्तर माहिती दिली. सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता झाल्यानंतर आम्हाला 'आई' धोरणाचा लाभ मिळाला. अगदी कमी कालावधीमध्ये प्रक्रिया पूर्ण झाली. बँकेकडून कर्ज मिळाल्यानंतर व्याजाची रक्कम 'आई' धोरणांच्या नियमांनुसार आम्हाला नियमित मिळते. शासनाकडून आर्थिक सहाय्य लाभल्यामुळे आमचा व्यवसायही सुरळीत सुरु आहे."

**-संध्या गरवारे,**
विभागीय संपर्क अधिकारी




# या टिप्स फॉलो केल्यास कमी येईल वीजबिल

उन्हाचा तडाखा वाढू लागला आहे. कडक उन्हापासून वाचण्यासाठी लोक दुपारच्या वेळी घराबाहेर पडणे टाळताना दिसतात. अशा स्थितीत वीज बिलात वाढ होणे स्वाभाविक आहे. उन्हाळ्यात एसी आणि कूलरच्या अधिक वापरामुळे वीज बिलात वाढ होते. त्यामुळे खिशावरचा आर्थिक भार वाढतो..रोजच्या वापरात काही बेसिक गोष्टींची काळजी घेतली तर लाईटबिल जास्त येणारच नाही आणि विजेचीही बचत होईल.



तुम्ही खोलीच्या बाहेर निघता तेव्हा लाईट किंवा इतर इलेक्ट्रोनिक्सच्या वस्तू बंद करायला विसरू नका. फोन चार्जर, लॅपटॉप या डिव्हाईसचा वापर होत नसेल आणि स्विच ऑन असेल तरीही बील येत जातं. म्हणून वापर झाल्यानंतर बटन्स बंद करायला विसरू नका. चार्जिंग झाल्यानंतर बटन्स न विसरता बंद करा.

एलईडी लाईट बल्ब ट्रेडिशनल बल्बच्या तुलनेत विजेची बचत करतात. ज्यामुळे लाईटबील कमी येते आणि दीर्घकाळ चालतात

जेव्हा ऊन्हाळा सुरू होतो तेव्हा एसी, कुलरची गरज लागतेच. अशावेळी लाईटबील खूप जास्त येऊशकतं. अशावेळी तुम्हाला लाईटबील कमी करण्यासाठी काही सोप्या ट्रिक्स फॉलो कराव्या लागतील जसं की २४ डिग्रीवर एसी सुरू ठेवा. जेणेकरून वेळोवेळी ऑफ होत राहील.

एसीच्या टेम्परेचरकडे लक्ष द्याउन्हाळ्यात एसीचे टेम्परेचर नेहमी २४ ते २६ अंश सेल्सिअस ठेवावे. त्यामुळे कूलिंग चांगल्या प्रकारे होते आणि जास्त वीजही लागत नाही. 'लक्षात ठेवा टेम्परेचर जितके कमी कराल तितकी वीज जास्त वापरली जाईल आणि बिल जास्त येईल. त्यामुळे तुम्ही चांगल्या परिणामांसाठी टायमर सेट करू शकता. आपल्या घरातील जुन्या वस्तू अपग्रेड करून तुम्ही जवळपास ४० टक्के वीज वाचवू शकता. जर तुम्ही साधारण फ्रिजऐवजी ५ स्टार रेटेड फ्रिजची निवड केली तर विजेचे बील ३० टक्क्यांनी कमी होईल. जुन्या फ्रिजमध्ये वारंवार प्रोब्लेम्स उद्भवतात कधी जास्त बर्फ तयार होतो तर कधी कुलिंग व्यवस्थित होत नाही अशावेळी तुम्ही नवीन फ्रिज घेण्याचा विचार केलात तर पैसे आणि वीज दोन्हींची बचत होईल.

# नाटककार गो.पु. देशपांडे

गो.पु. देशपांडे अर्थात गोविंद पुरुषोत्तम देशपांडे हे एक मराठी नाटककार, कवी आणि निबंधलेखक होते. त्यांचा जन्म रहिमतपूर येथे २ ऑगस्ट १९३८ रोजी झाला. आज त्यांचा स्मृतीदिन (१६ ऑक्टोबर २०१३) आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...



## निमित्त

सातारा जिल्ह्यातील रहितमतपूर हे त्यांचे गाव. त्यांना शाळेत घातल्यावर देशपांडे यांनी दीड वर्षातच पहिली ते तिसरी हा अभ्यास पुरा केला होता. रहिमतपूरहून ते १९५४मध्ये मॅट्रिक झाले, आणि पुढील शिक्षणासाठी बडोद्याला आणि नंतर दिल्लीला गेले. तेथे जवाहर नेहरू विद्यापीठातून त्यांनी चीन हा विषय घेऊन पीएच.डी.केली. हाच विषय घेऊन त्यांनी हाँगकाँग येथून एक पदविका मिळवली. त्यांचा मराठी संतकवींसकट इतर कवींच्या साहित्याचा चांगला अभ्यास होता. ते दिल्ली विश्वविद्यालयातून राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून निवृत्त झाल्यावर ते पुण्यात स्थायिक झाले होते. ते चिनी भाषा-तज्ज्ञ होते आणि भारत-चीन राजकीय संबंधाचे जाणकार होते.

जर्नल ऑफ आर्ट्स न्ड आयडियाज ह्या नियतकालिकाचे ते संस्थापक संपादक होते. शिक्षण बोर्डाचे आणि 'चायना रिपोर्ट'चे ते सभासद होते. गो.पु. देशपांडे यांचे आजोबा आणि आई-वडील ही सर्व मंडळी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात उतरलेली. वडील डॉक्टर होते आणि त्यांचा रहिमतपुरात दवाखाना होता. गो.पुंचा धाकटा भाऊ दिलीप आणि त्याच्याहून धाकटी बहीण ज्योती सुभाष. ज्योती सुभाष आणि त्यांची कन्या अमृता सुभाष या दोघीही लेखिका आणि अभिनेत्री आहेत. गो.पु. देशपांडे यांची कन्या प्रा.डॉ. अश्विनी देशपांडे या दिल्लीत अर्थशास्त्राच्या प्राध्यापक आहेत. गोपुंच्या चिरंजीवांचे नाव सुधन्वा आहे.

गो.पु. देशपांडे यांनी इंग्रजी-मराठीत वैचारिक, रंगभूमीविषयक, राजकीय आणि साहित्यविषयक लेखन भरपूर केले. प्रायोगिक नाट्यलेखनाच्या प्रवाहात गो. पु. देशपांडे यांनी विचारनाट्याची धारा पहिल्यांदा निर्माण करण्याचा यत्न केला. राजकीय जाणिवा ही या लेखनामागची प्रेरणा आहे. गो.पु. देशपांडे हे अनेक राजकीय चळवळींचे साक्षीदार होते; पूर्वी काहीसे संबंधितही होते. जाणतेपणाने त्यांनी राजकीय चळवळींचा अभ्यास केला होता, त्यामुळे त्यांच्या नाटकातील विचारांना आणि आशयाला एक प्रकारची विश्वासार्हता होती.

### गो.पु. देशपांडे यांनी लिहिलेली मराठी नाटके आणि इतर वाङ्मय

अंधारयात्रा (नाटक), अस्सा नवरा सुरेख बाई (नाटक), इत्यादी इत्यादी कविता (कवितासंग्रह), उध्वस्त धर्मशाळा (नाटक), एक वाजून गेला आहे (नाटक), चर्चक निबंध (भाग १, २) (निबंधसंग्रह), चाणक्य विष्णूगुप्त (नाटक), द वर्ल्ड ऑफ आयडियाज इन मॉडर्न मराठी (इंग्रजी पुस्तक), मामकाः पाण्डवाश्चैव (नाटक), रस्ते (नाटक), रहिमतपुरकरांची निबंधमाला भाग १, २ -नाटकी निबंध (लेखसंग्रह), शेवटचा दिस (नाटक. हिंदीतसुद्धा रूपांतरित), सत्यशोधक (नाटक; हिंदीतसुद्धा रूपांतरित)

### गो.पु. देशपांडे यांना मिळालेले पुरस्कार

जयवंत दळवी पुरस्कार, महाराष्ट्र फाउंडेशनचा जीवनगौरव पुरस्कार, महाराष्ट्र राज्य शासनाचा अनंत काणेकर पुरस्कार, संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९९६), रूपवेध प्रतिष्ठानचा तन्वीर सन्मान (मरणोत्तर, २०१३)

(साभार : विकिपीडिया)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# शिळे अन्न सतत गरम करून खाण्याचे परिणाम

भारतात अन्न हे पूर्णब्रम्ह मानले जाते. त्यामुळे अन्नाची नासाडी करु नये, अन्न वाया जाऊ देऊ नये असे नियम घरोघरी असतात. उरलेले शिळे अन्नही आपण आवडीने पुन्हा खातो. मात्र काही वेळा अन्न संपवण्याच्या नादात आपण आरोग्याची काळजी घ्यायला विसरतो. शिळे खाऊ नये हे तर आपल्याला माहिती आहे. रात्रीची उरलेली भाजी दुसऱ्या दिवशी आणि अगदी पुढचे तीन दिवसही आपण खातो. ती संपेपर्यंत गरम करुन खातात. फ्रिजमध्ये ठेवली की खराब होत नाही, पण असे करणे खरंच योग्य आहे का?



शिळे अन्न पुन्हा गरम केल्याने त्यातील पोषक घटकांचे प्रमाण कमी होते. विशेषतः जीवनसत्त्व ए, बी आणि सी सारखी विरघळणारी सत्वे गरम केल्यावर नष्ट होतात. त्यामुळे त्या अन्नातून शरीराला अपेक्षित पोषण मिळत नाही. वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिले तर, ६० अंश सेल्सियसपेक्षा जास्त तापमानावर अनेक सूक्ष्मजीव मरतात, पण काही उष्णतेस प्रतिरोधक बॅक्टेरिया गरम केल्यावरही टिकतात. जर अन्न योग्य प्रकारे थंड आणि गरम केले गेले नाही, तर हे बॅक्टेरिया पुन्हा वाढू शकतात आणि फूड पॉयझनिंगचा धोका वाढतो.

उरलेली भाजी फ्रिजमध्ये ठेवली तरी ती पूर्ण थंड झाल्यानंतरच ठेवावी. गरम भाजी थेट फ्रिजमध्ये ठेवल्यास ओलावा तयार होतो आणि त्यामुळे coli, Salmonella सारखे बॅक्टेरिया वाढू शकतात. विशेषतः पालेभाज्या, फुलकोबी, बटाटे आणि भात यांसारखे पदार्थ पुन्हा गरम करु नयेत, कारण त्यात नायट्रेट्स आणि ॲक्रिलामाइड्स नावाचे घटक तयार होतात. हे घटक शरीरात दीर्घकाळ राहिल्यास पचनसंस्था आणि यकृतावर वाईट परिणाम करू शकतात.

याचबरोबर वारंवार गरम केल्याने तेलात ऑक्सिडेशन होते, ज्यामुळे ट्रान्स फॅट्स निर्माण होतात. हे फॅट्स हृदयविकार, उच्च रक्तदाब आणि कोलेस्टेरॉल वाढवण्यास कारणीभूत ठरु शकतात. त्यामुळे वारंवार गरम केलेली भाजी शरीरासाठी हानिकारक ठरते. शिळे अन्न वाया जाऊ नये ही गोष्ट अगदी बरोबर असली तरी त्यालाही मर्यादा आहेत. एखादा पदार्थ जास्त दिवस तसाच असेल तर तो खाऊ नये. ताजे, गरमागरम असेच पदार्थ खावेत.

# कंत्राटी कामगारांची दिवाळी होणार गोड!

## नमुंमपाकडून ७५०० रुपयांची पगारवाढ, सानुग्रह अनुदान

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेतील विविध विभागांत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची दिवाळी यंदाच्या वर्षी अधिक गोड होणार असून त्यांना ७५०० रुपयांची पगारवाढ आणि सानुग्रह अनुदान दिवाळीपूर्वी मिळणार आहे. नवी मुंबई महानगरपालिकेतील विविध विभागांत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी दिलासा देणारा निर्णय स्थायी समितीत घेण्यात आला आहे.



वनमंत्री गणेश नाईक यांच्या सूचनेनुसार ८४९५ कंत्राटी कामगारांना घोषित करण्यात आलेली ७५०० रुपयांची पगारवाढ आणि दिवाळीत देण्यात येणारे सानुग्रह अनुदान येत्या १५ दिवसांत ठेकेदारामार्फत कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे निर्देश स्थायी समितीचे सभापती अशोक पाटील यांनी दिले आहेत. स्थायी समितीच्या बैठकीत सभागृहनेते सागर नाईक यांनी यासंदर्भातील ठराव मांडला होता. दुसऱ्या दिवशी वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते कामगारांना धनादेश देऊन खऱ्या अर्थाने आनंदाचा क्षण साजरा करणार असल्याचे सभागृहनेते सागर नाईक म्हणाले. आगामी सणासुदीच्या आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर कंत्राटी कामगारांचे पगार आणि फरक वेळेत थेट त्यांच्या बँक खात्यावर जमा करून त्यांना दिलासा द्यावा, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

सर्वपक्षीय सदस्यांच्या मान्यतेनंतर हा प्रस्ताव स्थायी समितीत मंजूर करण्यात आला आहे. याविषयी बोलताना सागर नाईक म्हणाले की, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या पगारवाढीचा निर्णय गणेश नाईक यांच्या सूचनेनुसार पालिकेतील सर्व कंत्राटी कामगारांना ७५०० रुपये पगारवाढ द्यावी, अशा प्रकारची भूमिका घेतली होती. त्यांच्या सूचनेनुसार महानगरपालिकेने निर्णय घेतला आणि त्या दृष्टीने याची अंमलबजावणी कधी होईल, अशी प्रशासन आणि आमची चर्चा चालू होती. महापौरांच्या नेतृत्वाखाली या विषयावर मॅरेथॉन बैठकादेखील झाल्या होत्या. या निर्णयाच्या अंमलबजावणीबरोबर कायदेशीर त्रुटी समोर आल्या. त्यामधून वाट काढत ७५०० रुपयांचा लाभ कामगारांना कसा द्यायचा त्यावर निर्णय झाला. करार प्रक्रिया येत्या दोन दिवसांत पूर्ण झाल्यानंतर पीएफविषयीची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होऊन जुलैपासून फरकासह कर्मचाऱ्यांना लाभ मिळेल, असे सभागृहनेते सागर नाईक यांनी स्पष्ट केले. या निर्णयामुळे कंत्राटी कामगारांची दिवाळी गोड होणार आहे.

वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते कर्मचाऱ्यांना पहिला धनादेश वाटप करण्याचा आमचा मानस असून तोच खऱ्या अर्थाने कर्मचाऱ्यांसाठी घेतलेल्या निर्णयाचा आनंद उत्सव साजरा करणारा क्षण असेल, असे सागर नाईक यांनी स्पष्ट केले.

**नवी मुंबई शहर मंत्री गणेश नाईक यांच्या नियोजनाखाली वसलेले आहे. येथील कंत्राटी कामगारांना साडेसात हजारांच्या पगारवाढीचा निर्णय घेऊन त्यांनी कर्मचाऱ्यांना न्याय दिला आहे. सभागृहनेते सागर नाईक यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने या निर्णयाची आखणी केली. शहराला सुंदर ठेवण्यासाठी योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांप्रति सर्व सदस्यांना आदर आहे. साडेसात हजार रुपयांची पगारवाढ आणि दिवाळीपूर्वी सानुग्रह अनुदान देण्याच्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.**

**–अशोक पाटील,**
स्थायी समिती सभापती

# बेलापूरमध्ये ६३ लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन

## आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते शुभारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

शारदीय नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वावर बेलापूरची ग्रामदेवता आई गोवर्धनी माता मंदिराच्या पायऱ्यांच्या सुधारणा कामासह विविध विकासकामांसाठी ६३ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून या कामांचे भूमिपूजन आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. आई गोवर्धनी माता मंदिराच्या पायऱ्यांच्या सुधारणा कामाचा २९ लाख रुपयांचा निधी आमदार मंदा म्हात्रे यांच्या मागणीनुसार मंजूर झाला. सदर कामाचा भूमिपूजन सोहळा आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते उत्साहात पार पडला.



किल्ले गावठाण येथील ऐतिहासिक मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना विशेषतः महिला, बालके आणि ज्येष्ठ नागरिकांना होणारा त्रास दूर करण्यासाठी हे काम महत्त्वाचे आहे. आधुनिक व सुदृढ जीवनशैलीसाठी बेलापूर गाव (सेक्टर १९/२०) येथील बाल विकास मंदिर शाळेसमोरील मोकळ्या मैदानावरील ओपन जिमच्या दुरुस्ती व सुधारण्यासाठी नऊ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. या कामाचा भूमिपूजन सोहळा संपन्न झाल्यामुळे तरुण, महिला आणि नागरिकांना व्यायामासाठी पुन्हा उत्तम सुविधा उपलब्ध होणार आहे.

ज्येष्ठ नागरिकांना निवांत वेळ घालवता यावा व त्यांची वाचनाची आवड जोपासावी यासाठी सीबीडी सेक्टर-८, अष्टविनायक सोसायटीजवळील उद्यानात सुसज्ज शेड व वृत्तपत्र वाचनालय उभारण्यात येणार आहे. त्यासाठी आमदार मंदा म्हात्रे यांनी २५ लाख रुपयांचा आमदार निधी मंजूर केला असून भूमिपूजन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. येथे नागरिकांना योगाही करता येणार आहे. या ठिकाणी लहान मुलांसाठी अंगणवाडी शाळाही भरवली जाणार आहे.

विविध विकासकामांच्या भूमिपूजन सोहळ्यावेळी भाजप नेते निलेश म्हात्रे, महेंद्र नाईक, अनिल कुदळे, आरती राऊळ, ज्योती पाटील, अल्का कामत, सिमरन शर्मा, विद्या राजपूत, राजू कोळी, जयदेव ठाकूर, प्रवीण हाटे, सीमा सोनावणे, माला पाठोडे, मनीषा ओझा, रुबी चौधरी, राजकुमारी सिंग आदी उपस्थित होते.

## महापौर सुजाता पाटील यांनी केली महापालिका शाळांची पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर देताना शैक्षणिक सुविधांच्या पूर्ततेकडेही लक्ष देण्याच्या दृष्टीने पालिका शाळांमधील स्थिती जाणून घेण्यासाठी महापौर सुजाता पाटील यांनी प्रत्यक्ष पाहणीस सुरुवात केली असून त्यांनी घणसोली, कोपरखैरणे, वाशी विभागातील शाळांना भेटी देऊन मौलिक सूचना केल्या.



पाहणी दौऱ्यात त्यांच्यासमवेत शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे, शिक्षणाधिकारी अशोक कडूस उपस्थित होते. शहर अभियंता शिरीष आरदवाड यांनीही पाहणी दौऱ्यात सहभाग घेतला. यावेळी महापौरांनी पायाभूत सुविधा तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांची माहिती जाणून घेतली.

# गव्हाण विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात; विविध उपक्रमांचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय आणि ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे गुरुवारी (दि. १५) भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि मिसाईल मॅन म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानाचा विस्तार व्हावा आणि पुस्तकांशी मैत्री दृढ व्हावी, या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाचे आयोजन इयत्ता सहावी अच्या विद्यार्थ्यांच्या वतीने वर्गशिक्षिका दर्शना म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे आणि पर्यवेक्षिका शशिकला पाटील यांच्या हस्ते डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वर्गप्रतिनिधी आराध्य पटवे याने श्रीफळ वाढवून डॉ. कलाम यांना आदरांजली वाहिली. कार्यक्रमाला क्रीडा प्रमुख सुरेश पारखे, ग्रंथपाल महेश म्हात्रे, प्रतिज्ञा घरत, दर्शना म्हात्रे, हर्षला पाटील, सोनाली घरत, ज्योत्स्ना कोळी, आफ्रिन शेख यांसह विद्यालयातील रयत सेवक उपस्थित होते. ग्रंथपाल महेश म्हात्रे यांच्या नियोजनातून वाचन प्रेरणा दिनाचा उपक्रम राबविण्यात आला.

इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना एकत्रित करून विविध विषयांवरील पुस्तकांचे वाचन करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. ग्रंथालयातील सामाजिक, राजकीय, मनोरंजक, ऐतिहासिक, शैक्षणिक व क्रीडाविषयक पुस्तकांसह गोष्टींची पुस्तके, कथा आणि कादंबऱ्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या. पाचवी ते आठवीतील अनेक विद्यार्थ्यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्यावर व वाचनाच्या महत्त्वावर विचार व्यक्त केले. अबू कुरेशी, सानवी पाटील, प्रगती केदारे, पार्थ ठाकूर, सिमरन दाखवा, समृद्धी सुंबळे, आदर्श खरात, जानवी घंटे, जय वर्तक, सबा परवीन, आझम खान, कृष्णा सिंह, श्रीधर सुतार, सिद्धीकाबी शेख, कार्तिकी कोळी आणि शिवानी रजक या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

यावेळी सांस्कृतिक विभागप्रमुख हर्षला पाटील व ग्रंथपाल महेश म्हात्रे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील यांनी केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि वाचनाविषयी निर्माण झालेली उत्सुकता यामुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## दुर्गामाता दौड : (माळ पाचवी)



**पनवेल : हिंदू समाज हा छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज यांच्या ध्येयधोरणांचा व्हावा ही काळाची गरज आहे. यासाठी नवरात्रोत्सवात आई तुळजाभवानीकडे आशीर्वाद तसेच मागणे मागायला जाणे म्हणजेच दुर्गामाता दौड. ही दुर्गामाता दौड गुरुवारी करंजाडे, नवीन पनवेल सेक्टर १८ तसेच नानोशी गाव येथे उत्साहात पार पडली. यामध्ये लहानग्यांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतला.**





## नवरंग रंग पिवळा



गव्हाण-कोपर हायस्कूल शिक्षिका वृंद



जासई हायस्कूल शिक्षिका वृंद, उरण



फुंडे हायस्कूल शिक्षिका वृंद, उरण



मोरू नारायण म्हात्रे विद्यालय, उलवे नोड



विश्वनिकेतन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट एन्ट्रप्रिनुअरशिप ॲण्ड इंजिनिअरिंग महिला वृंद, खालापूर

# उरण तालुक्यात खरीपातील भातपिके संकटात; शेतकरी चिंतेत

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यात पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने खरीप हंगामातील भातशेती संकटाच्या छायेत सापडली असून बहरलेली पिके पिवळी पडून करपल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे. तालुक्यातील भातशेती जरी हिरवीगार दिसत असली तरी प्रत्यक्ष परिस्थिती अतिशय चिंताजनक असून भातपिके पिवळी पडली असून काही ठिकाणी करपली आहेत.



त्यामुळे खरीप हंगामातील भातशेतीसह पुढील रब्बी हंगामातील कडधान्य पिके जमिनीच्या ओलाव्याअभावी शेतकऱ्यांना घेता येणार नाहीत. पाणथळीच्या जागा वगळता बहुतांशी शेती कोरडी पडून भातशेतीच्या जमिनीला भेगा गेल्या आहेत. यामुळे बहरलेली भातपिके संकटात आली आहेत. पावसाने रायगड जिल्ह्यासह उरण तालुक्यात पाठ फिरविल्याने शेती कोरडी पडली आहे. भातशेतीची लागवड करणारा येथील शेतकरी हातातोंडाशी आलेले भातपीक वाचवण्यासाठी धडपडत आहे. ज्या शेतकऱ्यांकडे विहिरी, तलाव आणि पाण्याच्या पंपाची व्यवस्था आहे असे तालुक्यातील शेतकरी भातशेतीला कृत्रिम पाणीपुरवठा करत आहेत. काही शेतकऱ्यांनी ओढ्या-नाल्याचे पाणी आडवून ते पाणी भातशेतीकडे वळविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

यंदा समाधानकारक उत्पादन हाती येईल, अशी आशा शेतकऱ्यांना होती, मात्र सप्टेंबरमधील पावसाची अनियमितता आणि ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीपासून जाणवणारी उघडीप यामुळे शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फिरण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. यंदा उत्पादनात निश्चित घट होणार असल्यामुळे वर्षभराची धान्याची गरज भागविणे शेतकऱ्यांना कठीण होणार असल्याची व्यथा येथील शेतकऱ्यांनी व्यक्त केली. या नैसर्गिक आपत्तीमुळे उरणच्या भातशेतीवर संकटाची कुऱ्हाड कोसळली असून भाताचे कोठार असलेल्या उरण तालुक्यातील भातशेती धोक्यात आली आहे.

त्यामुळे सर्वत्र दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.



नवरात्रोत्सव देवी दर्शन महिला मंडळ, खालापूर

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर वनराई बंधाऱ्यांच्या कामांना वेग

## चोचिंदे ग्रामस्थांनी श्रमदानातून बांधला वनराई बंधारा

**महाड : प्रतिनिधी**

येत्या काळात दुष्काळाच्या तीव्र झळा संपूर्ण महाराष्ट्राला सोसाव्या लागणार आहेत. याच पार्श्वभूमीवरती महाड तालुक्यात पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी सर्व ग्रामपंचायत मध्ये कार्यक्रम राबवले जात आहेत. याच अनुषंगाने चोचिंदे या गावातील ग्रामस्थांनी श्रमदानातून वनराई बंधारा बांधून पाणी अडवून ते जिरवण्याचा अभिनव उपक्रम राबविला आहे. महाड कृषी विभागाकडून त्यांना या कामांमध्ये सहकार्य करण्यात आले आहे.



महाड तालुक्यातील चोचिंदे कोंड या गावांमध्ये आई पद्मावती शेतकरी गटामार्फत तसेच ग्रामस्थांच्या वतीने श्रमदान करून महाड तालुका कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली ११.५ मीटर लांबीचा वनराई बंधारा बांधला. या वनराई बंधारामुळे पाण्याचे साठवण होऊन भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविले जाणार आहे. तसेच येत्या काळामध्ये दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण होणार असून, या परिस्थिती जवळ मुकाबला करण्यासाठी चोचिंदे गावातील ग्रामस्थांनी पुढाकार घेतला आहे.

अशाच पद्धतीने महाड तालुक्यात विविध गावांमधून होणारे बंधारे व पाणी नियोजनाचे कार्यक्रम राबविले जात आहेत. यावेळी मौजे चोचिंदे कोंड ता महाड जि रायगड येथील आई पद्मावती शेतकरी गटामार्फत दिनांक १४ ऑक्टोबर २०२६ रोजी श्रमदानातून ११.५० मीटर लांबीचा पालकमंत्री वनराई बंधारा बांधून पुर्ण केला. यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी वैभव खटकाळे, महाड तालुका कृषी अधिकारी धिरज तोरणे, कृषी अधिकारी जाधव, मंडळ कृषी अधिकारी भरत कदम, उप कृषी अधिकारी, किरण कोकरे, सहाय्यक कृषी अधिकारी बरकडे, दाबेकर, मोरे व शेतकरी गटातील सर्व शेतकरी उपस्थित होते.

# कलोते-रयती पूल धोकादायक स्थितीत; संरक्षक कठड्यांचा अभाव

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



खालापूर तालुक्यातील कलोते येथून रयती गावाकडे जाणाऱ्या पुलाची अवस्था सध्या धोकादायक बनली असून, पुलाला संरक्षक कठडे नसल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पुलाखालील लोखंडी सळया बाहेर आल्याने पुलाच्या सुरक्षिततेबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने या पुलाची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

या पुलावरून रयती गावाच्या हद्दीतील व्यसनमुक्ती केंद्र, फार्म हाऊस तसेच आदिवासी वाड्यांमधील नागरिक आणि आसपासच्या परिसरातील ग्रामस्थांची नियमित ये-जा सुरू असते. त्यामुळे हा पूल परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग आहे. मात्र, पुलाला संरक्षक कठडे नसल्याने वाहनचालकांना विशेष काळजी घेऊन प्रवास करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी तसेच पावसाळ्यात या मार्गावरून प्रवास करताना धोका अधिक वाढण्याची शक्यता आहे.

पुलाखालील लोखंडी सळया बाहेर आल्याने पुलाच्या बांधकामाची स्थिती तपासणे आवश्यक आहे. वेळीच दुरुस्ती न झाल्यास भविष्यात गंभीर दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा जबाबदार यंत्रणेने पुलाची तांत्रिक तपासणी करून त्याची सुरक्षितता निश्चित करावी. पुलाला मजबूत संरक्षक कठडे बसवावेत, बाहेर आलेल्या लोखंडी सळयांची दुरुस्ती करावी आणि आवश्यकतेनुसार पुलाचे मजबुतीकरण करावे, अशी मागणी होत आहे.

# खोपोलीत रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्या फळ विक्रेत्यांवर होणार दंडात्मक कारवाई

**खोपोली : प्रतिनिधी**

भाजी मंडईच्या रस्त्यावरील फळविक्रेत्यांनी रस्त्यावरच दुकाने थाटल्यामुळे वाहतुककोंडी होत आहे. काही ग्राहक आपली वाहने रस्त्यावरच उभी करतात यामुळे नागरिक, महिला आणि अबालवृध्दांनी गर्दीतून वाट काढवी लागत असल्याने खोपोलीतील नागरिकांमधून प्रचंड संताप व्यक्त होत असून तशा तक्रारी आमच्याकडे आल्याने नगरपालिका प्रशासनाने कठोर निर्णय घेतला असून रस्त्यावर थाटलेली दुकाने दोन दिवसात मागे घ्या अन्यथा ५ ते १० हजार रूपयाचा आर्थिक दंड ठोठावला जाणार आहेत तसेच वाहतुककोंडीवर आळा बसविण्यासाठी दुकानासमोर




बॅरिगेटस करणार असल्याचा निर्णय प्रशासनाने घेतला अशी माहिती नगराध्यक्ष कुलदिपक शेंडे यांनी दि

महात्मा फुले भाजी मार्केटच्या रस्त्यावर फळ आणि भाजीपाल्याचे दुकाने आहेत. दुकानदारांनी रस्त्यावर फळभाजीचे स्टॉल लावले आहे, त्यामुळे ग्राहकांना रस्त्याच्या मधेच उभे राहून खरेदी करावी लागत आहे. यादरम्यान प्रचंड वाहतूककोंडी होत असल्याने नागरिकांना आणि वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. वाहतूककोंडीवर तोडगा काढवा यासाठी नगराध्यक्ष कुलदिपक शेंडे यांच्याकडे वारंवार तक्रारी आल्यानंतर नगराध्यक्ष शेंडे यांनी फळविक्रेत्यांची १४ ऑक्टोबर रोजी बैठक बोलवून दोन दिवसात स्वतः दुकाने मागे घेण्याची विनंती केली अन्यथा अन्यथा ५ ते १० हजार रूपयाचा आर्थिक दंड ठोठावला जाईल अशी तंबी दिली आहे.

# यशवंतनगरच्या सीएसएन विद्यालयात पोलिसांतर्फे सायबर जनजागृती

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड पोलिस ठाण्यातर्फे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील यशवंतनगर पंचक्रोशीतील सि.एस.एन.विद्यालयातसायबर जनजागृती कार्यक्रम नुकताच घेण्यात आला.

पोलीस अतुल बागवे व सुमित वाकार्डे यांनी यावेळी विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांविषयी माहिती देऊन फसवणूक झाल्याचे लक्षात येताच एक तासाच्या आत १९३० या क्रमांकावर आपली तक्रार नोंदवल्यास असे गुन्हे त्वरित उघडकीस आणले जाऊ शकतात.अशी माहिती दिली.

आजकालच्या जमान्यात थेट चोरी,डाके तसेच दरोड्यांचे प्रमाण कमी झाले असले तरी सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे.त्याकरीता सर्वांनी सजग राहून मोबाईल वरुन येणारे फ्रॉड कॉल , मेसेजेसला बळी न पडता केवळ जरुरी पुरतेच वापर करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

उपस्थितांचे स्वागत शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी संतोष बुल्लु यांनी केले.यावेळी मुख्याध्यापिका अर्चना खोत, मंगेश नांदगावकर, दत्तात्रय खुळपे ,अमर दरणे ,एम.टी.अहिरे ,राहिल घलटे, योगेश पाटील, भारत चव्हाण, सागर राऊत,भारती बांद्रे,नियती ठमके , शिल्पा कळके, प्रितम शेडगे, राऊत ,डोंगरीकर मॅडम तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# कंपनीत प्रवेश करून कामगारांना मारहाण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत हायटेक इंटरनॅशनल कंपनीमध्ये तसेच कंपनीसमोर दुचाकीच्या अपघाताच्या कारणावरून कामगारांना मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार हायटेक इंटरनॅशनल कंपनीतील एक कामगार मोटरसायकलवरून जात असताना त्याच्या दुचाकीचा एका स्कूटीशी अपघात झाला. या घटनेच्या कारणावरून आरोपींनी संगनमत करुन आरोपींनी प्रथम साक्षीदाराला लोखंडी रॉडने मारहाण केली तसेच कंपनीमध्ये विनापरवानगी प्रवेश करून इतर साक्षीदारांना झाडू व हाताबुक्क्यांनी मारहाण व दमदाटी केली.

# माणगाव येथे सेवा संकल्प अभियान; ४५३ लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ वितरित

**माणगाव : बातमीदार**

सेवा संकल्प अभियानांतर्गत माणगाव येथे दिनांक १५ ऑक्टोबर रोजी मध्यवर्ती प्रशासकीय भवन, तहसील कार्यालय, माणगाव येथे 'सेवा संकल्प अभियान शिबिर' उत्साहात संपन्न झाले.या शिबिराचे उद्घाटन व मुख्य कार्यक्रम रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत पार पडला.मान्यवरांच्या उपस्थितीत लाभार्थ्यांना शासकीय योजनांचे लाभ वितरित करण्यात आले.

या शिबिराच्या माध्यमातून माणगाव तालुक्यातील विविध शासकीय विभागांशी संबंधित एकूण ४५३ लाभार्थ्यांना प्रत्यक्ष योजनांचे लाभ व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.तसेच व्यासपीठावर ६८ लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मंत्री महोदयांच्या हस्ते लाभ व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

महसूल विभागामार्फत नॉन-क्रीमीलेयर दाखले, जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले, डोमिसाईल दाखले, विविध नमुने, विवाह नोंदणीसह विविध प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. महिला व बालविकास विभागामार्फत लेक लाडकी योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजना आणि बेबी केअर किटचे वाटप करण्यात आले.

उपजिल्हा रुग्णालयामार्फत दिव्यांग प्रमाणपत्रे व विवाह नोंदणी प्रमाणपत्रे, तर नगरपंचायत कार्यालयामार्फत स्वच्छ भारत अभियानांतर्गत वैयक्तिक शौचालय अनुदान, प्रधानमंत्री आवास योजना, शबरी आदिवासी घरकुल योजना आणि जन्म-मृत्यू नोंदीसंबंधी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

पंचायत समिती कार्यालयामार्फत विवाह नोंदणी प्रमाणपत्र, जन्माचा दाखला आणि कर आकारणी नोंदींसंबंधी उतारे देण्यात आले. तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत महिला शेतकरी प्रमाणपत्रे व कृषी यांत्रिकीकरणांतर्गत ट्रॅक्टर अनुदानासंबंधी लाभ देण्यात आला. तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयामार्फत आयुष्मान भारत कार्ड, तर एस.टी. महामंडळामार्फत एनसीएमसी कार्डचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले, यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी, जिल्हा प्रशासनातील अधिकारी आणि संबंधित विभागांच्या कर्मचाऱ्यांनी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गटविकास अधिकारी, माणगाव यांनी केले. रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, अपर जिल्हाधिकारी सचिन ढोले, उपविभागीय अधिकारी डॉ. संदीपान सानप यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. यावेळी माणगाव तहसीलदार विपिन लोकरे, कर्मचारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# पालीत आठ फुटी अजगराला सर्पमित्राने दिले जीवदान

**पाली :** सुधागड तालुक्यातील एकविरा गणपती मंदिरामागील परिसरात राहणाऱ्या प्रसाद यादव यांच्या घराजवळ एक आठ फूट लांबीचा अजगर आढळून आला. पालीतील सर्पमित्र दत्तात्रय सावंत यांनी या अजगराला पकडून सुरक्षितपणे जीवनदान दिले आहे.

प्रसाद यादव यांच्या परिसरामध्ये हा अजगर आल्याची माहिती मिळताच, पालीतील सर्पमित्र दत्तात्रय सावंत यांनी कोणतीही वेळ न घालवता त्वरित घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी अत्यंत संयमाने आणि शिताफीने या अजगराला आपल्या नियंत्रणात आणले आणि सुरक्षितपणे पकडले.

या घटनेत नागरिकांनी दाखवलेले सहकार्य आणि सर्पमित्राची तत्परता यामुळे मानवी वस्तीत आलेल्या या अजगराला कोणताही त्रास न देता सुरक्षित पकडण्यात आले. त्यानंतर वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली या अजगराला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सुखरूप सोडण्यात आले. यावेळी सर्पमित्र दत्तात्रय सावंत यांनी सांगितले की मानवी वस्तीमध्ये कोणताही साप आल्यास नागरिकांनी न घाबरता तसेच सापाला कोणती दुखापत न करता सर्पमित्राला बोलवावे असे आवाहन केले.




## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ३८/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | इसाम्बे औद्योगिक क्षेत्र... इसाम्बे औद्योगिक क्षेत्राला वीज पुरवठ्याच्या पायाभूत सुविधा पुरवणे... २२ केव्ही लाईन फीडरचे ०.१ चौ. इंचावरून ०.२ चौ. इंचाच्या एसीएसआर कंडक्टरमध्ये अपग्रेडेशन करणे. (दुसरी मागणी) | ₹ १,२९,७३,८२४.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २२/१०/२०२६ ते दिनांक ०२/११/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २६/१०/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २८/१०/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना क्र. ३

ई निविदा सूचना क्र.२३ /२०२६-२०२७ (मुंबई) करीता

दिनांक ०९/०७/२०२६ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक हिंदूस्थान टाईम्स, मुंबई , दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक प्रातःकाल, मुंबई, दैनिक भास्कर, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड , दैनिक सागर, ठाणे या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत व कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलासा उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचेनांव | अंदाजितरक्कम |
|---|---|---|
| १ | रानसई पाणीपुरवठा योजना.. रानसई धरणाच्या ओव्हरफ्लो विभागाची विशेष दुरुस्ती करणे, ऊर्जा क्षय व्यवस्था, गाईड भिंत बांधणे, रानसई धरणाच्या ड्रेनेज पाइपलाइन स्थलांतरीत करणे व विस्तार करणे. | ₹ २४,८०,००,५०१.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २८/१०/२०२६ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १६/११/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# टीम इंडियाला पराभूत करून वेस्ट इंडिजची मालिकेत बरोबरी

## शाई होपच्या शतकानंतर कीमो पॉलच्या पाच विकेट्स



**हैदराबाद : वृत्तसंस्था**

कर्णधार शाई होपच्या विक्रमी शतकानंतर कीमो पॉलने गोलंदाजीत पाच विकेट्स घेत वेस्ट इंडिजच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. 'करो वा मरो'च्या लढतीत पाहुण्या संघाने टीम इंडियाला २४ धावांनी पराभूत करत पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-२ अशी बरोबरी साधली. आता बंगळुरूच्या मैदानातील पाचव्या आणि अखेरच्या सामन्यात मालिका कोण जिंकणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

हैदराबादच्या मैदानात नाणेफेक जिंकून श्रेयस अय्यरने पहिल्यांदा गोलंदाजीचा निर्णय घेतला. दोन बदलांसह मैदानात उतरलेल्या वेस्ट इंडिजने सुरुवातीपासून दमदार फटकेबाजी करत भारतीय गोलंदाजांचे खांदे पाडले. शाई होपने ५० चेंडूत चार चौकार आणि नऊ षटकार मारत २०४च्या स्ट्राईक रेटसह केलेल्या १०२ धावा आणि अखेरच्या षटकात शेरफेन रुदरफोर्डने २६ चेंडूत चार चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने केलेल्या ४९ धावांच्या जोरावर वेस्ट इंडिजच्या संघाने निर्धारित २० षटकात तीन विकेट्सच्या मोबदल्यात २४७ धावा करत टीम इंडियासमोर विक्रमी २४८ धावांचे टार्गेट सेट केले होते.

होप आणि रुदरफोर्डशिवाय शेमरॉन हेटमायर ३३ (१२), रोव्हमन पॉवेल २४ (१७) आणि सलामीवीर अँड्रने १६ चेंडूत २१ धावांचे योगदान दिले. टीम इंडियाकडून अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना संजू सॅमसन याने अवघ्या २० चेंडूत अर्धशतक झळकावत संघाला दमदार सुरुवात करून दिली. तो मोठी खेळी करण्याच्या मूडमध्ये असताना कीमो पॉल पिक्चरमध्ये आला. त्याने भारताच्या डावातील पाचव्या षटकातील पहिल्याच चेंडूवर भारताला पहिला आणि मोठा धक्का दिला. याच षटकात ईशान किशनलाही त्याने माघारी धाडले. १९व्या षटकात तो पुन्हा गोलंदाजीला आला अन् मोक्याच्या क्षणी या षटकात तीन विकेट्स घेत त्याने वेस्ट इंडिजच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. भारतीय संघाने त्याच्या दोन षटकाशिवाय गुडाकेश मोती घेऊन आलेल्या १२व्या षटकात पाठोपाठ दोन विकेट्स गमावल्या. या तीन षटकातच टीम इंडिया सामन्यात मागे पडली.

संजू सॅमसनच्या अर्धशतकाशिवाय टीम इंडियाकडून तिलक वर्मा ४३ (२५) आणि नितीश कुमार रेड्डी ४१ (२०) या दोघांनी घरच्या मैदानावर तुफान फटकेबाजी करत मैफील लुटली. ही जोडी जमल्यावर सामना पुन्हा टीम इंडियाच्या बाजूने फिरेल, अशी वळण्याची आस निर्माण झाली होती, पण रोमारियोने तिलकला तर पॉलने नितीशच्या खेळीला ब्रेक लावत टीम इंडियाच्या उरल्या सुरल्या आशा संपुष्टात आणल्या. अखेरच्या षटकात एक उसळता चेंडू अर्शदीप सिंगच्या खांद्याला लागला. तो रिटायर्ड हर्ट झाला अन् वेस्ट इंडिजने २४ धावांनी सामना जिंकत मालिकेत २-२ अशी बरोबरी साधली.

# आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेसाठी तुषार सिनलकर यांची निवड



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय तायक्वांदो पंच तुषार सिनलकर यांची जपान येथे होणाऱ्या पाचव्या आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय तांत्रिक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

सिनलकर हे रायगड जिल्ह्यातील असून त्यांनी यापूर्वी विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पंच म्हणून काम करत आपल्या कौशल्याचा आणि अनुभवाचा ठसा उमटवला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरासोबतच त्यांनी राष्ट्रीय स्तरावरही महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत.

आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धा ही आशिया खंडातील दिव्यांग खेळाडूंसाठी आयोजित केली जाणारी एक महत्त्वाची बहुक्रीडा स्पर्धा आहे. या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय तांत्रिक अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल सिनलकर यांचे अभिनंदन होत आहे. अनेकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# ओम पावशेची कबड्डी शिबिरासाठी निवड



**धाटाव : प्रतिनिधी**

जय बजरंग क्रीडा मंडळ, रोहा येथील अष्टपैलू कबड्डीपटू ओम रवींद्र पावशे याची रायगड जिल्ह्यातून महाराष्ट्र कुमार गट कबड्डी संघाच्या निवड शिबिरासाठी निवड झाली आहे. या निवडीमुळे रोहा तालुक्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

बिहारमधील पाटणा येथे १ ते ४ नोव्हेंबरदरम्यान होणाऱ्या ५२व्या कुमार गट राष्ट्रीय अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर हे निवड शिबिर आयोजित करण्यात आले आहे. त्यासाठी ओमची निवड झाली आहे. याबद्दल जय बजरंग क्रीडा मंडळाचे अध्यक्ष अमर सलागरे यांनी ओमचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# स्मृती मानधाला खुणावतोय मोठा विक्रम



**रायपूर : वृत्तसंस्था**

भारतीय महिला क्रिकेट संघाची नवी कर्णधार स्मृती मानधना झिम्बाब्वेविरुद्धच्या घरच्या मैदानातील टी-२० मालिकेतून नव्या इनिंगची सुरुवात करत आहे. नेतृत्वाची नवी जबाबदारी सांभळताना या मालिकेत स्मृतीला बॅटरच्या रुपात कर्तृत्वाची खास छाप सोडण्यासाठी मैदानात उतरेल.

क्रिकेट इतिहासात आतापर्यंत कुणालाच जमले नाही ते करून दाखवण्याची संधी स्मृतीकडे आहे. यासाठी तिला फक्त १३३ धावांची आवश्यकता आहे. झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेत स्मृतीकडे आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये पाच हजार धावा करणारी पहिली क्रिकेटर होण्याची संधी असेल.

भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना १६ ऑक्टोबरला रायपूरच्या मैदानात खेळला जाणार आहे.

### दुहेरी भूमिकेकडे लक्ष

झिम्बाब्वेविरुद्धची मालिका स्मृती मानधनासाठी खास असेल, कारण ती पहिल्यांदाच पूर्णवेळ कर्णधाराच्या रुपात मैदानात उतरेल. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय संघाला सुवर्णपदक जिंकून दिल्यावर हरमनप्रीत कौरने कर्णधारपद सोडले. त्यानंतर ही जबाबदारी आता स्मृतीकडे आहे. क्रिकेटमध्ये नेतृत्व आणि फलंदाजीतील कर्तृत्व अशी दुहेरी भूमिका तिला निभवायची आहे.

# सामना गमावूनही भारताने रचला इतिहास

**नवी दिल्ली** : वेस्ट इंडिजविरुद्धचा चौथा टी-२० सामना भारतीय संघाने गमावला, पण टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एक रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. भारतीय संघ टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासात दोन हजार षटकार खेचणारा जगातील दुसरा, तर आशियातील पहिलाच संघ ठरला आहे.

वेस्ट इंडिजचा संघ टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दोन हजार षटकार खेचणारा जगातील पहिलाच संघ आहे. त्यांनी मालिकेतील तिसऱ्या टी-२० सामन्यादरम्यान हा पल्ला गाठला होता. त्यानंतर पुढच्याच सामन्यात भारतीय संघाने हा कारनामा केला. विंडीजच्या नावे सर्वाधिक २०२६, तर भारताच्या नावे आतापर्यंत २०१० षटकार आहेत.

# एकाच षटकात पाच विकेट्स!

## सीएसए टी-२० चॅलेंज स्पर्धेत चॅड लेकॉकची कमाल



**ओव्हल : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेच्या चॅड लेकॉक या गोलंदाजाने एका षटकात पाच विकेट्स घेत जागतिक क्रिकेटमध्ये डंका वाजवला. सध्या टी-२० क्रिकेटमध्ये जिथे चौकार-षटकारांची आतिषबाजी पाहायला मिळत आहे, तिथे या गोलंदाजाने विकेट्सची रांग लावली.

चॅड लेकॉक हा दक्षिण आफ्रिकेचा एक वेगवान गोलंदाज आणि अष्टपैलू खेळाडू आहे. त्याने डर्बनमधील ग्लेनवूड हायस्कूलमध्येच क्रिकेटचे धडे गिरवण्यास सुरुवात केली; तिथे इयत्ता दहावीत असतानाच त्याने आपल्या फलंदाजी आणि गोलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. सीएसए टी२० चॅलेंज स्पर्धेत क्वाझुलु-नाताल इनलँड टस्कर्स संघाकडून खेळताना टायटन्सविरुद्धच्या सामन्यात त्याने एकाच षटकात पाच बळी घेत खळबळ उडवून दिली.

क्वाझुलु-नाताल संघासाठी चॅड लेकॉकने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याने आपल्या चार षटकांच्या स्पेलमध्ये २६ धावा देऊन सहा बळी घेतले, ज्यामध्ये एकाच षटकात पाच बळींचा समावेश होता. या कामगिरीसह पुरुषांच्या टी-२० क्रिकेटच्या इतिहासात एका षटकात पाच विकेट्स घेणारा लेकॉक केवळ चौथा गोलंदाज ठरला आहे. त्या एका षटकात त्याने केवळ दोन धावा दिल्या.





## झंकार नवरात्रोत्सव















पनवेल : येथील सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानात आयोजित झंकार नवरात्रोत्सवात चौथ्या दिवशी संजय जैन, पदम जैन, राजेंद्र रांका, नितीन गवळी, डॉ. कुणाल माखिजा, डॉ. अमृत ताम्हणकर, डॉ. रविश वैष्णव, डॉ. निकेत गांधी, डॉ. गौरव शेटे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली. यावेळी दांडिया स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com